
University of Mumbai

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका

(Peer-Reviewed Research Journal)



वर्ष ०१ ❖ अंक ०८

एप्रिल २०२१

# संभाषित

मुंबई विद्यापीठाची महाजालावरील आंतरविद्याशाखीय तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिका (Peer-Reviewed Research Journal)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२९व्या जयंतीचे (१४ एप्रिल २०२०) औचित्य साधून अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा, मुंबई विद्यापीठ यांच्या कल्पनेतून 'संभाषण' या द्विभाषिक (इंग्रजी आणि मराठी) ऑनलाईन संशोधनपत्रिकेचा जन्म झाला. विभिन्न विद्याशाखांमध्ये समकालीन प्रश्नांबाबतच्या चिकित्सक चर्चेला गतिमान करणे आणि विचारमंथनाद्वारे संवाद प्रस्थापित करणे या भूमिकेचे अधिष्ठान 'संभाषण' संशोधनपत्रिकेच्या मुळाशी कार्यरत असलेले दिसते.

'कोरोना' हा विषय केंद्रस्थानी असलेले 'संभाषण'चे तीन अंक प्रकाशित झाले आहेत. तसेच अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'संभाषण'चा ऑगस्ट महिन्याचा अंक 'अण्णा भाऊ साठे विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला आहे. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण देशातून या विशेषांकाचे भरभरून स्वागत झाले. तसेच विविध अभ्यासशाखेतील अभ्यासकांनीही सदर विशेषांकाचे संदर्भमूल्य मान्य केले, ही अत्यंत आश्वासक बाब आहे.

'संभाषण'च्या माध्यमातून इंग्रजी आणि मराठी असा द्विभाषिक संशोधनपत्रिकेचा एकत्रित सुरू झालेला प्रवास अत्यंत आनंददायी आणि प्रेरणादायी होता. मात्र काही तांत्रिक कारणांसाठी मराठी आणि इंग्रजी भाषेतील संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित होणे अपरिहार्य ठरले. तसेच मुंबई विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात जुने विद्यापीठ असल्यामुळे राज्यभाषेतून ज्ञानव्यवहार आणि संशोधनव्यवहाराला चालना देण्याचा मुद्दाही अग्रक्रमाने पुढे आला. याला अनुसरूनच मराठी भाषेतील आंतरविद्याशाखीय संशोधनपत्रिका स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावी असा प्रस्ताव विद्यापीठाने ठेवला. हा प्रस्ताव अनेक अर्थांनी महत्त्वाचा असल्यामुळे सप्टेंबर २०२०पासून 'संभाषित' या नावाने मराठी संशोधनपत्रिकेची स्वतंत्र वाटचाल सुरू झाली आहे.

# 'संभाषित'ची रूपरेषा

- सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध स्तरांतील महत्त्वपूर्ण प्रश्न आणि घडामोडींविषयी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणातून सिद्ध होणारी मांडणी पुढे येण्यासाठी अभ्यासक/ संशोधकांना खुला मंच उपलब्ध करून देणे ही 'संभाषित'ची मूलभूत भूमिका आहे.

- संशोधन आणि संशोधनात्मक लेखन हे अंतिमत: समाजासाठीच आहे. त्यामुळे या लेखनाचा एक गृहीत पैलू हा सामाजिकता आहे, या बांधिलकीतून सैद्धांतिक आणि कृतिशील अशा दोन्ही स्तरांवर काम करणाऱ्या अभ्यासक / संशोधकांचे लेखन समाजाच्या विविध स्तरापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच विविध सामाजिक स्तरांमधील वाचकाची अभिरुची आणि वैचारिक जडणघडण सकस होण्यासाठी आवश्यक असणारा अवकाश सिद्ध करण्याची प्रेरणा 'संभाषित'च्या मुळाशी कृतिशील आहे.

- भारताच्या बरोबरीने भारताबाहेरील मराठी भाषिक अभ्यासक / संशोधकाच्या परिदृष्टीतून जागतिक आणि भारतीय अवकाशातील विविध प्रश्नांविषयीची विश्लेषक मांडणी समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न करणे, हे 'संभाषित'चे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

- संशोधनपर, भाष्यपर आणि पुस्तक परीक्षणपर असे तीन विभाग 'संभाषित'मध्ये अंतर्भूत आहेत. या विभागांत समाविष्ट होणारे लेख सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध क्षेत्रांशी संबंधित असल्यामुळे ही संशोधनपत्रिका समाजाच्या विविध स्तरांशी आपला वैचारिक अन्वय जोडेल, असा विश्वास आहे.

- मानव्यविद्याशाखेतील विविध अभ्यासविषयांशी निगडित सैद्धांतिक विवेचन करणाऱ्या लेखांच्या बरोबरीने समाजजीवनातील अनेकस्तरीय संदर्भांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करणाऱ्या लेखांचाही समावेश सदर संशोधनपत्रिकेत केला जाणार आहे. स्वाभाविकच, विविध अभ्यासविषयांशी संबंधित नवनवी सिद्धांतने मराठी भाषेतून पुढे आणणारा हा अतिशय महत्त्वाचा अकादमिक मंच ठरू शकेल.

# शोधनिबंधांसंदर्भातील मार्गदर्शक सूचना

- लेख स्वतंत्र संशोधनावर आधारित असावेत.

- लेखांची शब्दमर्यादा साधारण पुढीलप्रमाणे असेल.
  शोधनिबंध - ३५००-४००० शब्द
  भाष्य - १५००-२००० शब्द
  ग्रंथपरीक्षण - १०००-१२०० शब्द

- शोधनिबंध देवनागरी लिपीमध्ये युनिकोड फॉन्टमध्ये असावेत.
  फॉन्टचा आकार साधारणपणे १२ ते १४ बिंदूमध्ये (point) असावा.

- संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना अंकाच्या शेवटी नोंदविल्या आहेत. लेखात संदर्भ देताना या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

- संशोधनपर लेख विषयतज्ज्ञांच्या सकारात्मक अभिप्रायानंतरच अंकात समाविष्ट केले जातात.

- लेख editorinchief.sambhashit@mu.ac.in व editor.sambhashit@mu.ac.in या दोन्ही मेलवर पाठवावेत.

## प्रकाशक

*अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय, मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.*

ही संशोधनपत्रिका समाजविज्ञान, मानव्यविद्याशाखा आणि विधी या विद्याशाखांमधील सद्य:कालीन प्रश्नांना आंतरविद्याशाखीय दृष्टिकोणातून भिडणाऱ्या अभिनव आणि टीकात्मक निबंधांचा स्वीकार करते.

“मानसिक स्वातंत्र्य कोणाला आहे असे म्हणता येईल? जो आपली बुद्धी जागृत ठेवून आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय यांची जाणीव करून घेतो त्याला मी स्वतंत्र म्हणतो. जो परिस्थितीचा दास झाला नाही, जो परिस्थितीला आपल्या कह्यात आणण्यास सिद्ध असतो, तो माणूस स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो रूढीच्या स्वाधीन झाला नाही, जो गतानुगतिक बनला नाही,ज्याच्या विचाराची ज्योत विझली नाही तो स्वतंत्र आहे, असे मी म्हणतो. जो पराधीन झाला नाही, जो दुसऱ्याच्या शिकवणीने वागत नाही, जो कार्यकारणभाव ध्यानात घेतल्याशिवाय कशावर विश्वास ठेवित नाही, जो आपल्या हक्कांचा अपहार केला असता, त्याच्या रक्षणार्थ दक्ष असतो, जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याच्या हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे, असे मी समजतो. जो आपल्या आयुष्याचे ध्येय व आपल्या आयुष्याचा व्यय दुसऱ्याने घालून दिलेल्या आज्ञेप्रमाणे ठरवित नाही, जो आपल्या बुद्धीनुसार आपल्या आयुष्याचे ध्येय काय असावे व आपले आयुष्य कोणत्या कार्यात व कशारीतीने व्यतीत करावे हे आपले आपण ठरवितो, सारांश जो सर्वस्वी स्वाधीन आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे,असे मी समजतो.”

**-डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८,भाग १, पृ. ५०६)

# संपादकीय मंडळ

मुंबई विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांचा '**संभाषित**' ई- नियतकालिकाला असलेला आश्वासक पाठिंबा आणि सहकार्य यासाठी आम्ही आदरपूर्वक आभार मानतो.

**मुख्य संपादक** : **डॉ. राजेश खरात**
अधिष्ठाता, मानव्यविद्या शाखा
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**सल्लागार संपादक** : **डॉ. नीतिन आरेकर**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
श्रीमती चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर.

**संपादक** : **डॉ. शीतल पावसकर-भोसले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सेवा सदनचे आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर.

**सहसंपादक** : **डॉ. नीतीन रिंढे**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
चेतनाचे श्रीमती कुसुमताई चौधरी कला महाविद्यालय,
वांद्रे (पूर्व), मुंबई.

**डॉ. मंगेश बनसोड**
वरिष्ठ साहाय्यक प्राध्यापक, अकॅडमी ऑफ थिएटर आर्ट्स
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**परीक्षण संपादक** : **डॉ. अश्विनी तोरणे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
डॉ. टी. के. टोपे रात्र महाविद्यालय, परळ, मुंबई.

**साहाय्यक संपादक** : **डॉ. अनंत लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख
संत राऊळ महाराज महाविद्यालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**प्रा. आशा हुंबे-पडळकर**
व्याख्याता, मराठी विभाग
भवन्स (कनिष्ठ) महाविद्यालय, अंधेरी, मुंबई.

**डॉ. नारायण गडदे**
साहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. नारायण भोसले**
साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. प्रतिभा टेंबे**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
बदलापूर, जि. ठाणे.

**डॉ. माधुरी पाथरकर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

**डॉ. लता पांचाळ**
अभ्यागत व्याख्याता व मुक्त संशोधन-अभ्यासक
कल्याण, जि. ठाणे.

**प्रा. संजय इंगोले**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
एल.जी.एम. महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**डॉ. सुनील अभिमान अवचार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**डॉ. सोनाली वाखरडे**
साहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. विवेक कुडू**
साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख
सोनोपंत दांडेकर कला महाविद्यालय, पालघर

रेखाटने : **डॉ. सुनील अभिमान अवचार**

मांडणी व सजावट : **प्रशांत पांचाळ**
ग्राफिक डिजायनर, कल्याण, जि. ठाणे.

तांत्रिक साहाय्य : **डॉ. लता पांचाळ**

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी मुंबई विद्यापीठ, संपादक, संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।।
वित्तविना शूद्र खचले ।
एवढे अनर्थ एका अविद्येने केले ।।

**- जोतीराव फुले**

ब्रिटीशपूर्वकाळात भारतातील शिक्षणपद्धती ही वेद, धर्मशास्त्र आणि तर्कशास्त्र अशा पारंपरिक विषयांना प्राधान्य देणारी होती. पण ती समाजातील सर्व वर्गांना उपलब्ध नव्हती. ब्रिटीशकाळात मात्र शिक्षणासंबंधीचे विचार आणि पद्धती यांच्या बदलास प्रारंभ झाला. सामाजिक सुधारणेच्या वैचारिक प्रवाहात शिक्षण हा सार्वत्रिक हक्क मानला गेला आणि तो तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कृतिशील पावले उचलली गेली. विशेषत: जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विचार व जीवनकार्यातून समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि शिक्षण हाच खरा मुक्तीचा मार्ग आहे, हे दाखवून दिले. ‘संभाषित’चे संपादकीय मंडळ या दोन्ही महामानवांच्या कार्यास त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करते.

जोतीराव फुले यांनी समाजाला गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी सर्वांगीण समता, मानवता आणि विवेकवाद हा मार्ग सांगितला. विद्यार्थ्यांच्या मनावर नैतिकतेचे संस्कार करणारी शिक्षणपद्धती त्यांना अपेक्षित होती. तसेच शिक्षणाचे स्वरूप हे सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे आणि व्यावहारिक असावे, असे त्यांचे मत होते. जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायकेंद्री विचारांनी समाजजागृती झाली. पण समकालीन परिस्थितीत या मूल्यांचे भान जागते राखणे, हे मोठे आव्हान आहे.

आपण या आधुनिक मूल्यांना केवळ वैयक्तिक नागरी हक्क म्हणून पाहतो. परंतु सामाजिक वर्तनप्रक्रियेत याकडे विशेष लक्ष देत नाही. लेखकाचे लेखन हाही सामाजिक वर्तनप्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. आधुनिक मूल्यांना कायदेशीर मान्यता आहे. पण समाजाच्या वर्तनप्रक्रियेत ते सुरक्षित नाहीत. त्यामुळे व्यक्तीच्या लिखाणातून

संभाषित

ज्ञानाचे असे प्रारूप साकारले पाहिजे की, ज्याद्वारे नवनिर्मितीबरोबरच आधुनिक मूल्यांचेही भान व्यक्त होईल, त्यात 'न्याय' हा एक मापदंड असेल आणि तो विचारांना आधुनिकतेकडे घेऊन जाणारा असेल.

मनुष्य आपल्या आयुष्यात स्वतःहून खूप कमी शिकत असतो. मानवाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत समाजाचे मोठे योगदान असते आणि लेखन व वाचन हे त्यात भर घालत असते. व्यक्तीचे लेखन केवळ मानवाच्या क्षमतांचा विकास करत नाही तर व्यक्तीने समाजाप्रती कोणत्या प्रकारचा प्रतिसाद द्यायचा आहे, यासाठीही ते व्यक्तीला तयार करते. म्हणून लेखन हे सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घेणारे तसेच व्यक्तीच्या मनात आधुनिक मूल्यांच्या जाणिवा निर्माण करणारे आणि समाज उपयुक्ततावादी विचार मांडणारे असावे.

ज्ञानप्रक्रियेचा व्यवहार हा दुहेरी आहे, ज्ञान मानवाला आकार देते आणि ज्ञानाला आकार मानव देत असतो. यासाठी मानव सातत्याने 'का' आणि 'कसे' या प्रश्नांचा शोध घेत असतो. मानवाच्या मनातील शंका हेच ज्ञाननिर्मितीचे मुख्य स्रोत आहे. मानवाला 'का' व 'कसे' यांच्या शोधात जी उत्तरे सापडतात त्याला ज्ञान म्हणता येते. या प्रक्रियेत सातत्यपूर्ण चिकित्सा होत असल्याने कित्येकवेळा ज्ञानाची पुनर्मांडणीदेखील होत असते. मानवाची एखादी कृती चूक आहे की बरोबर, योग्य की अयोग्य हे केवळ त्यांच्या परिणामावरून ठरते. मानवाच्या स्वयंप्रेरणा आणि ज्ञानेंद्रियांच्या जाणिवा या विचारांना आकार देत असतात. प्रत्येक व्यक्ती व समूदाय आपले जगणे समजून घेण्यासाठी आपल्या अनुभवावरून आणि अस्तित्वाच्या स्थितीवरून जगण्याचे अर्थ लावत असतात. मानवाला जगण्याच्या विशिष्ट परिस्थितीत आकलन झालेल्या विचारातून वेगवेगळे ज्ञान उदयास येत असते. पण जेव्हा ज्ञानाच्या उत्पत्तीची ही नैसर्गिक प्रक्रिया मोडीत काढून प्रस्थापित व्यवस्थेचे तत्त्वज्ञान ज्ञानजगतात सत्ता गाजवते तेव्हा इतरांच्या अस्तित्वाची स्थिती, जगण्याची परिस्थिती आणि जीवनानुभवातून येणारे ज्ञान दबले जाते.

आज मानवाची विविध क्षेत्रात प्रचंड प्रगती झालेली दिसते. पण कुठलेही तत्त्वज्ञान, विकास किंवा प्रगती समाजातील भेदभावाची भावना नष्ट करू शकलेले नाही. मानवाचे तत्त्वज्ञान, समृद्ध जीवन आणि विकास जर मानवाला एकत्र बांधू शकत नसतील तर आपण 'काय' साध्य केले, हा प्रश्न पडतो.

संपादकीय

ज्ञाननिर्मितीतून जीवन जगण्याचे आदर्श तत्त्वज्ञान सांगण्यापेक्षा मानवाच्या जगण्याचे वेगवेगळे अर्थ समजण्यासाठी बहुविध ज्ञान निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी अवतीभवती घडणाऱ्या घटना, क्रिया आणि व्यवहार यांची चिकित्सा करावी लागते. मानव आपल्या कल्पनाशक्ती व अनुभवांचा आधार घेत व्यावहारिक कृतीतून जगण्यासंबंधीचे सर्वसामान्य आकलन करत असतो. तसेच आपल्या विविध कल्पना, श्रद्धा, रीती, परंपरा, विचारधारा, मूल्य, प्रमाणके, वर्तन-व्यवहार यातून आपले सामान्य ज्ञान मांडत असतो. लोकांच्या विचारपद्धतीतून आणि अनुभवातून आलेल्या या ज्ञानाला आपण सामान्य ज्ञान किंवा व्यावहारिक ज्ञान मानतो. इथे प्रत्येकवेळी तर्कपूर्ण मांडणी नसते. या सर्वांची जेव्हा विज्ञाननिष्ठ अशी चिकित्सा होते तेव्हा खरे ज्ञान (ज्याला शास्त्रीय ज्ञान म्हणता येते असे ज्ञान) समोर येते. लोकांची विचारपद्धती आणि शास्त्रीय ज्ञान यात फरक आहे. शास्त्रीय ज्ञान हे पुरावे, तर्क, कारणमीमांसा, सखोल तपास, सर्वांगीण विचार, सुसंगतता, चिकित्सा, निरीक्षण, पडताळणी, प्रायोगिक तत्त्व यांवर आधारित निष्कर्ष यावर अवलंबून असते. असे शास्त्रीय स्वरूपाचे आणि लोकव्यवहाराचे ज्ञान आकलन करून घेण्यासाठी आणि मानवाच्या एकूणच जीवनविषयक ज्ञानाची वृद्धी करण्यासाठी लेखन साहाय्यभूत ठरते. म्हणून लेखन हे जबाबदारीने आणि जाणीवपूर्वक घडणे आवश्यक ठरते.

निरक्षर माणसे साक्षरांकडे मोठ्या आशेने पाहतात. त्यांची अशी एक भावना असते की, आपल्याला जास्त काही कळत नाही, शिक्षित लोकांकडे खूप ज्ञान असते आणि ते जे सांगतील ते खरे असते. यामुळे शिक्षितांवर विशेषतः लेखन करणाऱ्यांवर ही खूप मोठी जबाबदारी आहे की त्यांनी जगापुढे वास्तव मांडावे. मानवतावादी, विज्ञानवादी आणि वास्तववादी विचार मांडावेत. 'नीतीविना मती' ही अनर्थ घडवू शकते. न्यायतत्त्वाची नीती जर विद्वानांच्या अंगी नसेल तर अविद्येपेक्षा विद्येनेच जास्त अनर्थ घडू शकतो. आज आपल्याला चांगल्या समाजापेक्षा न्याय्य समाजाची जास्त गरज आहे, हे समजून घेण्याची सर्वाधिक निकड आहे.

**- सोनाली वाखरडे**

# शोधनिबंध आणि पुस्तक परीक्षण

# अनुक्रम...

## शोधनिबंध

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन शैक्षणिक प्रश्न** १५
दिलीप चव्हाण

**क्रमयोग** ४०
मानसी वाळिंबे

## पुस्तक परीक्षण

**जुगाड : शिक्षित तरुणांच्या ध्येयवादी स्वप्नांची शोकात्म कहाणी** ५०
नंदकुमार मोरे

**बिजापूर डायरी : समाजकार्याचा प्रेरणादायी प्रवास :** ६५
रविकांत शिंदे

**रायटिंग द फर्स्ट पर्सन : आधुनिक केरळमधील स्व-विषयक लिखाणाची समीक्षा** ७३
राहुल सरवटे

# शोधनिबंध

संशोधन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन शैक्षणिक प्रश्न

**दिलीप चव्हाण**

प्राध्यापक, इंग्रजी विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

dilipchavan@gmail.com

संमाशिल

## भारतातील शिक्षण आणि सामाजिक संरचना

आधुनिक काळात शिक्षण हे स्पर्धात्मक हितसंबंधांचे क्षेत्र आहे. कोणत्याही समाजातील शिक्षणव्यवस्था ही सोपानात्मक व्यवस्था असणाऱ्या सामाजिक संरचनेचा अविभाज्य भाग असते. प्राचीन भारतातील शिक्षणव्यवस्था ही तत्कालीन समाजातील सत्तारचनेला अनुरूप अशी होती. प्राचीन भारतात शिक्षण हे सर्व घटकांना समानपणे उपलब्ध नव्हते. भारतातील वर्णग्रस्त प्राचीन धर्मात शिक्षणासंबंधीच्या आदेशांमुळे शूद्र वर्ण आणि स्त्रियांना शिकण्याची परवानगी नव्हती. शिक्षणाचा आशयही वर्ण आणि जातिव्यवस्थेशी सुसंगत होता. कोणत्याही समाजात शालेय शिक्षण हा संपूर्ण समाजाचा (समाजातील सर्व घटकांचा) सेंद्रिय भाग कधीच नव्हता.

वासाहतिक काळातील शिक्षणव्यवस्थेत अंशतः वसाहतपूर्व शिक्षणव्यवस्थेचे सातत्य होते. जातीच्या जुन्या पूर्वग्रहांचा वसाहतवादी राजवटीवर काहीही परिणाम झाला नाही, असे नाही. वसाहतवादी भारतातील सत्ताधारी वर्गात ब्रिटिश राज्यकर्ते आणि स्थानिक द्विज जातींचा समावेश होता. गेल ऑमवेट यांच्या भाषेत सांगायचे तर वसाहतवाद हा राज्यकर्त्या वर्गाचा बाह्यतम घटक होता आणि जात हा सत्तेचा आंतरिक घटक होता.

वासाहतिक सत्तेचा कल आधुनिक-पूर्व सामाजिक संरचनेला सहकार्य करण्याकडे होता. भारतात वसाहतवादी सत्ताधारी वर्गाने उच्चवर्णीयांना सहकार्य केले. वसाहतवादी राज्यकर्त्यांनी 'सर्वांना शिक्षण' हे आपले ब्रीदवाक्य आहे, असे कधीही जाहीर केले नव्हते. वासाहतिक काळातील शैक्षणिक योजना प्रामुख्याने वसाहतवादी शासक आणि स्थानिक उच्चभ्रू यांच्यात मध्यस्थी करू शकणाऱ्या सुशिक्षित मूळ रहिवाशांचा एक वर्ग निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रेरित होत्या, हे सर्वश्रुत आहे. जोतीराव फुले (१८२७-१८९०) यांनी 'राष्ट्रीय शिक्षण आयोगा'ला (१८८२) (ज्याला 'हंटर कमिशन' असेही म्हणतात) दिलेल्या साक्षीकडे अजूनही पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या मधोमध इंग्लंडमध्ये उच्चवर्गीयांसाठी उत्कृष्ट शिक्षणव्यवस्था असली तरी मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू करताना पश्चिम युरोप आणि अमेरिकेतील अनेक देशांच्या तुलनेत इंग्लंड स्वत: मागे होता, हेही लक्षात ठेवले पाहिजे.

संभाषित

**सामंतशाही, औद्योगिक क्रांती आणि शिक्षण**

पूर्वीच्या सामंतशाही व्यवस्थेचा ऱ्हास घडवून आणणे, ही युरोपमधील लोकशाही क्रांतीच्या घटनेसाठी एक प्रकारची पूर्वअट होती. भांडवलदारी वळणाचं औद्योगिकीकरण हे ठळक वैशिष्ट्य असलेला नवा समाज हा तीन परस्परसंबंधित पण वेगवेगळया सांस्कृतिक चळवळींचा थेट परिणाम होता - धर्मसुधारणा, प्रबोधन आणि पुनर्जनन.

मध्ययुगीन सामंतशाहीची जुनी सामाजिक व्यवस्था विस्कळीत होत असताना व्यापारी, बँकर्स आणि व्यावसायिक हितसंबंध यांचा समावेश असलेला उदयोन्मुख मध्यमवर्ग जुन्या उच्चभ्रू वर्गाला आव्हान देण्यास सुरुवात करू लागला होता. पंधराव्या ते अठराव्या शतकातील प्रबोधनयुगाने नव्या लोकशाही क्रांतीसाठी युरोपीय समाजाची तयारी केली होती. अशा सांस्कृतिक चळवळीच्या पार्श्वभूमीवर सामंतशाही व्यवस्थेत उत्पादन आणि उत्पादनसंबंधांच्या पातळीवर क्रांती घडवून आणता आली.

रूसो (१७१२-१७७८) आणि व्होल्टेअर (१६९४-१७७८) यांनीही तत्कालीन सामंतशाही व्यवस्थेला दूर करण्याचा प्रयत्न केला. कोपर्निकस (१४७३-१५४३), गॅलिलिओ (१५६४-१६४२), न्यूटन (१६४२-१७२७), वास्को द गामा (१४६०/६९-१५२४) आणि ख्रिस्तोफर कोलंबस (१४५१-१५०६) यांनी भांडवलदारी विकासाच्या वाटा प्रशस्त केल्या. या परिवर्तनादरम्यान चर्चचे वर्चस्व, राजाचा दैवी हक्क आणि जमीनदारीवर आधारलेली सामंती व्यवस्था यांना उदयोन्मुख भांडवलदारांनी आव्हान दिले.

प्रबोधनाच्या काळात साहित्य, चित्रकला, संगीत इत्यादी क्षेत्रांत मोठा बदल (मेटामॉर्फसिस) झाला. धार्मिक सुधारणावादाने विशेषतः रोमन कॅथलिक चर्चला त्याच्या जुलमी स्वरूपामुळे लक्ष्य केले आणि प्रबोधनामुळे बौद्धिक क्षेत्रात क्रांती घडून आली. या काळात फ्रान्सिस बेकन (१५६१-१६२६) आणि रेने डेकार्ट (१५९६-१६५०) हे दोन महत्त्वाचे तत्त्ववेत्ते होते. बेकनने सर्व प्रकारच्या चिकित्सेला वैज्ञानिक आधार देण्याचा प्रयत्न केला, तर नैसर्गिक विज्ञान विकसित करण्यासाठी तर्काच्या वापरावर भर देणारे डेकार्ट हे पहिले विचारवंत मानले गेले. समकालीन धार्मिक व्यवस्था त्यांना मान्य नव्हती. त्यांच्या प्रभावाखालील डेनिस डिडेरो (१७१३ -१७८४) या फ्रेंच तत्त्ववेत्त्याने *विश्वकोशा*चे १७ खंड प्रकाशित केले आणि प्रकाशनानंतरच्या पहिल्या तेवीस वर्षांत ४३ आवृत्त्या प्रकाशित करण्यात आल्या. या ग्रंथाचे

सुरुवातीला २८ खंड होते, ज्यात ७१,८१८ लेख आणि ३,१२९ दाखले होते. डिडेरोची इच्छा होती की, *विश्वकोशा*चा उपयोग 'सामान्य माणसांची विचार बदलण्याची (करण्याची) पद्धती बदलण्यासाठी' केला जावा. त्याचा *विश्वकोश* हा 'व्यापक आणि चिकित्सक' अशा स्वरूपाचा होता. प्रबोधनाच्या या काळात डिडेरोला *विश्वकोशा*द्वारे सर्व लोकांना त्यांचे ज्ञान वृद्धिंगत करण्याची क्षमता बहाल करायची होती आणि प्रत्येक व्यक्तीला जगाबद्दल कोणतेही ज्ञान उपलब्ध करून द्यायचे होते. फ्रान्सच्या राज्यकर्त्या वर्गाला धोका म्हणून त्याच्या *विश्वकोशा*कडे पाहिले जात होते.

जुन्या सामंतशाही व्यवस्थेच्या पतनात ज्ञान आणि शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची होती. सर्वांना शिक्षण ही त्या वेळच्या मागास आणि श्रमप्रधान अशा जुन्या सामंतशाही व्यवस्थेतील उत्पादनव्यवस्थेची गरज नव्हती. अशी मागास उत्पादनप्रणाली किमान कौशल्याने चालू राहू शकत असे. तथापि, जुनी सामंतशाही व्यवस्था जेव्हा तीव्र अशा संकटात सापडली तेव्हा उत्पादनाची नवी तंत्रे शोधणे, नवीन वसाहतींचा शोध लावणे आणि त्यांचा ताबा घेणे, नव्या व्यापारी मार्गांचा शोध घेणे, उत्पादनात वाढ होणे, यासाठी नव्या वैज्ञानिक ज्ञानाची गरज होती. आधुनिक शिक्षण आणि ज्ञानाचे प्राथमिक कार्य हे जनतेची मनोभूमिका, ही नवी भांडवलदारी मूल्ये आणि जीवनशैली यांना स्वीकारण्यासाठी तयार करणे, हे होते.

युरोपीय संदर्भात, सर्वांसाठी शिक्षणाची मागणी करण्याचे श्रेय जर्मन धार्मिक सुधारक मार्टिन ल्यूथर (१४८३-१५४६) यांना जाते. तथापि, त्यांच्या दृष्टीने शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन हे धार्मिक होते, धर्मनिरपेक्ष नव्हते (Anagol, n.d. : 1). १५२४ मध्ये जर्मन नगरपालिकांना पत्र पाठवून त्यांनी असा युक्तिवाद केला की, शालेय शिक्षणाची सोय करणे, हे नगरपालिकांचे कर्तव्य आहे; तर आपल्या मुलांना शिक्षण देणे, हे पालकांचे कर्तव्य आहे (Weiner 1991:79).

तथापि, सुशिक्षित आणि कुशल कामगार वर्ग नव्या औद्योगिक व्यवस्थेची गरज बनेपर्यंत सर्वांना शिक्षण, या धोरणाची तादृश आवश्यकता नव्हती. औद्योगिक क्रांतीच्या आसपास इंग्लंडमधील शिक्षणाच्या राजकीय इतिहासावरून असे दिसून येते की, सत्ताधारी वर्ग आधुनिक शिक्षणामुळे शक्य होणाऱ्या परिणामांना खारीज करण्यासाठी धर्माचा वापर करत राहिला. इंग्लंडमध्ये नव्याने उदयास आलेल्या भांडवलदार वर्गामुळे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षण अधिकाधिक धर्मात अडकून पडले. प्रशिक्षित

मनुष्यबळ आणि नव्या बाजारपेठेसाठी ग्राहकांचा एक वर्ग या गरजेपोटी आधुनिक भांडवलशाहीने शिक्षणाच्या संकल्पनेला प्रोत्साहन दिले आणि १८७० मध्ये शिक्षणाचा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार पुढील दहा वर्षांपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिक यश साध्य करायचे होते. १८७० ते १८८० या कालावधीत ३,००० ते ४,००० शाळा सुरू करण्यात आल्या किंवा शाळा मंडळांनी ताब्यात घेतल्या. पोर्तुगाल, फ्रान्स, स्पेन, डेन्मार्क, ऑस्ट्रिया, हंगेरी, स्वीडन, नॉर्वे, स्वित्झरलँड अशा बहुतेक विकसित देशांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस शिक्षण अनिवार्य करण्यासाठी कायदे केले. युरोपमध्ये, एकापाठोपाठ एक देश—स्कॉटलंड, प्रशिया, ऑस्ट्रिया आणि स्वीडन; फ्रान्स, इंग्लंड आणि इटली यांनी नंतर शिक्षण अनिवार्य केले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस प्राथमिक शालेय शिक्षण अनिवार्य करणारा जपान पहिला गैर-पाश्चिमात्य देश ठरला.


**जात आणि तिची संस्थात्मक निरक्षरतेशी असलेली अतूटता**

भारतात ब्राह्मणी धर्माने जातीवर आधारित शिक्षणव्यवस्थेचे संस्थीकरण केले होते आणि शिक्षणव्यवस्थेने खालच्या जातीच्या कोट्यवधी लोकांना स्वत:कडे असलेले ज्ञान आणि जीवनाच्या अनुभवाचे संस्थीकरण करण्यापासून वंचित ठेवले होते. जोतीराव फुले यांनीच ब्राह्मणी धर्म आणि संस्कृतीवर हल्ला चढवला. अँण्टोनियो ग्राम्शीने (१८९१-१९३७) प्रभुत्वाची संकल्पना मांडण्यापूर्वी फुले यांना समजले होते की, भारतातील उच्चवर्णीयांनी बळ आणि संमती या दोन्हींचा वापर करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यांच्यामते कनिष्ठ जातींवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी आणि अशा प्रकारे गुलामगिरी साध्य करण्यासाठी उच्चवर्णीयांनी वैचारिक शस्त्राचा अधिक सूक्ष्मपणे वापर केला.

फ्रँत्ज फेनॉन (१९२५-६१) यांनी 'बुद्धिजीवी' या संकल्पनेसाठी वापरलेल्या 'सामान्य संधीसाधू' ( Fanon 1974 : 38) या संकल्पनेप्रमाणे फुले यांनी उच्चजातीय बुद्धिजीवी हे वासाहतिक सत्तेचा लाभ कसा घेत होते, हे मांडले आहे. *गुलामगिरी* हे पुस्तक लिहिण्यामागे त्यांचे एक उद्दिष्ट होते, 'सरकारचे डोळे उघडणे' आणि ब्रिटिशांना ब्राह्मणांपासून सावध करण्याविषयी सल्ला देणे.[1] 'हंटर कमिशन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहिल्या भारतीय शिक्षण आयोगाकडे सादर केलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे त्यांचे प्रस्ताव आजही प्रासंगिक आहेत: १) स्त्रियांच्या

शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर २) अस्पृश्य वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार ३) मुस्लिमांसारख्या अल्पसंख्याकांमध्ये शिक्षणाचा प्रसार ४) ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार.

लोकशाही क्रांतीत शिक्षणाचे महत्त्व सर्वप्रथम फुले यांनी ओळखले. म्हणूनच त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर — विशेषतः स्त्री, शूद्र आणि अतिशूद्र जातींसाठी—शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिला होता. जातीवर आधारित शिक्षणव्यवस्थेची जागा वसाहतवादी राजवटीत भारतात सुरू करण्यात आलेल्या तुलनेने अधिक प्रगतिशील आणि उदारमतवादी शिक्षणव्यवस्थेने घ्यावी, अशी त्यांची इच्छा होती. तथापि, भारतातील वसाहतवादी राज्याने केलेल्या प्रगतीच्या मर्यादाही त्यांना जाणवल्या होत्या. त्यांनी आपल्या लिखाणात ‘वसाहतवाद ही शोषणाधिष्ठित व्यवस्था’ म्हणून त्यावर टीका केली होती. ज्याप्रमाणे वसाहतवादाच्या आर्थिक परिणामांची फुले यांना जाणीव होती त्याचप्रमाणे वासाहतिक सत्तेचे सर्वाधिक लाभार्थी हे कनिष्ठ जाती नव्हे; तर उच्च जाती होत्या, हेदेखील ते पुरेपूर जाणून होते. जात ही एक अंतर्गत वासाहतिक सत्ता आणि वसाहतवाद ही एक बाह्य वासाहतिक सत्ता यांच्यामधील एकत्वाची आणि घनिष्ठ संबंधांची तीव्र जाणीव असल्यामुळे त्यांनी उच्चजातीय समूहाच्या इच्छांना बळी पडल्याबद्दल ब्रिटिशांवर जोरदार हल्ला चढवला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे गुरू असलेल्या जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या लोकशाही क्रांतीचे अपूर्ण कार्य पुढे नेले. नव्याने उदयास आलेला भारतीय भांडवलदार वर्ग जुनी जात-सामंतशाही व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची ऐतिहासिक जबाबदारी पार पाडण्यास तयार नव्हता आणि त्यासाठी पात्रदेखील नव्हता. युरोपमध्ये लोकशाही क्रांतीदरम्यान प्रदीर्घ संघर्षानंतर जमिनीचे पुनर्वितरण करण्यात आले; जमीनदारी व्यवस्था कोसळली आणि भूदासांना स्वत:च्या जमिनी कसण्यासाठी देण्यात आल्या. अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंड 'भूदासांची भूमी' बनला होता (Cooper 1967 :419). तथापि, भारतीय भांडवलदार जमीनसुधारणांच्या कल्पनेच्या विरोधात राहिले तसेच फुले यांनी सुरू केलेल्या आणि आंबेडकरांनी पुढे सुरू ठेवलेल्या सामाजिक क्रांतीचे सर्वात मोठे विरोधक म्हणूनही उदयास आले. भारतीय भांडवलावर जातीआधारित मालकी राखणे, धर्माचे वर्चस्व टिकवून ठेवणे आणि भारतातील व्यापक निरक्षरता टिकवून ठेवणे यामध्ये या वर्गाचे सर्वात मोठे हित होते.

प्रबोधन ही सर्व प्रकारच्या क्रांतिकारी बदलांची पूर्वअट आहे, असा युक्तिवाद करताना आंबेडकरांनी १९३६ साली लिहिले:

The religious Reformation started by Luther was the precursor of the political emancipation of the European people. In England Puritanism led to the establishment of political liberty. Puritanism founded the new world. It was Puritanism which won the war of American Independence and Puritanism was a religious movement. The same is true of the Muslim Empire. Before the Arabs became a political power they had undergone a thorough religious revolution started by the Prophet Mohammad. Even Indian History supports the same conclusion. The political revolution led by Chandragupta was preceded by the religious and social revolution of Buddha. The political revolution led by Shivaji was preceded by the religious and social reform brought about by the saints of Maharashtra. The political revolution of the Sikhs was preceded by the religious and social revolution led by Guru Nanak. It is unnecessary to add more illustrations.

These will suffice to show that the emancipation of the mind and the soul is a necessary preliminary for the political expansion of the people (Ambedkar 2019: 44).

सामंतवादी विचारधारा, मूल्ये, संस्कृती इत्यादींचा निषेध करण्यासाठी लोकांना तयार करणे, ही कोणत्याही समाजातील प्रबोधनाची ऐतिहासिक भूमिका आहे. यामुळे लोकांना नवी भांडवलशाही मूल्ये आणि जीवनशैली स्वीकारण्याची तयारीही होते. तथापि, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सर्वांना शिक्षण आणि सामाजिक प्रबोधन या संकल्पनांना विरोध केला. फुले आणि आंबेडकरांनी वर्ण आणि जातीवर जोरदार हल्ला चढवला त्यावेळी बाळ गंगाधर टिळक (Rao 2010), मोहनदास क. गांधी (Mani:2005), सर्वपल्ली राधाकृष्णन् (Minor 1997 : 386-400) आदी नेते जाती आणि वर्णाधिष्ठित विचारसरणीचे कट्टरपंथीय राहिले.

## डॉ. आंबेडकर : वसाहतवादी शिक्षणधोरणावर कठोर टीका

वसाहतवादी शैक्षणिक धोरण तुलनेने अधिक उदारमतवादी असले आणि ब्रिटिश राजवटीत शिक्षण तत्त्वत: सर्वांना खुले असले तरी खालच्या जातींना शिक्षण देण्यात ब्रिटिशांना कमीत कमी रस होता. ब्राह्मण उच्चभ्रू आणि वासाहतिक राज्याच्या समूहहितावर आंबेडकरांनी जोरदार टीका केली. 'बहिष्कृत हितकारिणी सभे'च्या वतीने 'भारतीय वैधानिक आयोगा'ला सादर केलेल्या बॉम्बे प्रेसिडेन्सीमधील बहिष्कृत वर्गाच्या शिक्षणाच्या स्थितीसंदर्भात आंबेडकरांनी आपल्या निवेदनात वसाहतवादी राज्यावर जोरदार टीका केली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या वसाहतवादी पत्रव्यवहाराचा हवाला देत त्यांनी वसाहतवादी शिक्षण धोरणाचा उच्चवर्णीयांना कसा फायदा झाला, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाबाबतचे ब्रिटिश धोरण उच्चवर्णीय समर्थक आहे, हे सिद्ध करण्यासाठी आंबेडकरांनी मुंबई प्रांताचे माजी गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (१७७९-१८५९) यांच्या लेखनाचा हवाला दिला :

It is observed that the missionaries find the lowest castes the best pupils. But we must be careful how we offer any special encouragement to men of that description. They are not only the most deprived, but among the least numerous of the great divisions of society; and it is to be feared that

संभाषित



if our system of education first root among them, it would never spread further, and that we might find ourselves at the head of a new class superior to the rest in useful knowledge, but hated and despised by the castes to whom these new attainments would always induce us to prefer them. Such a state of things would be desirable, of we were contended to rest our power on our army or on the attachment of a part of the population, but is inconsistent with every attempt to found it on a more extended basis (Forrest, 1884: 105 ) (गायकवाड २००८ : १०८-१०९).

वसाहतवादी राज्य प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका डॉ. आंबेडकरांनी केली. वसाहतवादी राजवटीच्या सुरुवातीच्या काळापासून प्राथमिक शिक्षणाकडे स्थानिक सरकारचे कर्तव्य म्हणून पाहिले जात होते. उदाहरणार्थ, माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी शिक्षणाची एक योजना आखली होती. त्यानुसार उच्चशिक्षण राज्य संरक्षणासाठी पात्र मानले जात होते आणि प्राथमिक शिक्षणाची काळजी स्थानिक पंचायतीकडून घेतली जाणार होती, प्राथमिक शिक्षणावरील खर्च ग्रामखर्चामधून केला जाणार होता. १९२३ साली ब्रिटिश सरकारने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी स्थानिक जिल्हा शाळा मंडळाकडे सोपवण्याचा कायदा मंजूर केला होता. मुंबईत ही जबाबदारी मुंबई महानगरपालिकेकडे सोपवण्यात येणार होती. आंबेडकरांनी या निर्णयात लाखो कनिष्ठ जातींच्या मुलांना शिक्षणापासून रोखण्याची एक दुष्ट योजना म्हणून पाहिले. गावे आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्था जातीय-सामंतशाहीच्या मानसिकतेत अडकल्या आहेत आणि त्यामुळे प्राथमिक शिक्षण बिघडेल, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यांनी या निर्णयाचे वर्णन 'क्रूर' आणि 'प्रति-क्रांतिकारी' असे केले. त्यांनी बरोबर सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उत्पन्नाचा पुरेसा स्रोत नव्हता आणि शिवाय विविध प्रादेशिक राज्यांमध्ये विविध प्रमाणात आर्थिक परिस्थिती आणि उत्पन्नाचे स्रोत होते. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक जिल्हास्तरीय स्थानिक मंडळांकडे पुरेसा निधी नव्हता. स्थानिकीकरणाद्वारे शिक्षणाचा प्रश्न सुटू शकत नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्याऐवजी शिक्षण केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असले पाहिजे.

रस्ते बांधणे किंवा गटार स्वच्छ करणे, यापेक्षा शिक्षण देणे वेगळे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जेव्हा दलितांनी शाळेत जायला सुरुवात केली तेव्हा गावात त्यांना सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांची अनेक उदाहरणे त्यांनी सादर केली. प्राथमिक शिक्षणाच्या अशा प्रकारच्या क्षुल्लक कारणामुळे शेवटी शिक्षणाची अवस्था निराशाजनक झाली.

ब्रिटिशांनी जे धोरण आखले आहे, ज्यामुळे केवळ ब्राह्मण वर्गालाच फायदा होणार होता, अशी टीका आंबेडकरांनी ब्रिटिशांवर केली. उत्पादन शुल्क महसुलाच्या माध्यमातून खर्च झालेली एकूण रक्कम शिक्षणासाठी वापरण्यात यावी, असे त्यांनी सांगितले. सरकारने शिक्षणावर प्रति व्यक्ती केलेला खर्च केवळ १४ आणे होता, मात्र सरकारने उत्पादन शुल्क महसुलाच्या स्वरूपात वसूल केलेली रक्कम २ ते २.९ रुपये (२.१७ रुपये) होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

प्राथमिक शिक्षणाबाबतचे त्यांचे मत ब्रिटिश आणि भारतीय उच्चभ्रू लोकांपेक्षा वेगळे होते. प्राथमिक पातळीवरच मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणाबाहेर पडले, असा युक्तिवाद करण्यासाठी त्यांनी डोळे उघडणारी आकडेवारी सादर केली. प्राथमिक शाळेत प्रवेश घेतलेल्या दर शंभर मुलांपैकी केवळ अठरा मुले चौथीपर्यंत पोहोचत असत, याकडे त्यांनी लक्ष वेधले. उर्वरित १०० पैकी ८२ जण निरक्षरच राहिले (Ambedkar 2014 A: 40). त्यामुळे प्राथमिक शिक्षणावर अधिक पैसे खर्च करण्यासाठी त्यांनी शिक्षणमंत्र्यांना आवाहन केले.[2] एका रूपकाचा उपयोग करून असा युक्तिवाद केला की, जर एखाद्या मुलाने चौथ्या इयत्तेनंतर शाळा सोडली तर



त्यावर खर्च होणारा पैसा वाया जातो आणि ते मूल पुन्हा निरक्षरतेच्या गर्तेत ढकलले जाते.

Sir, this argument is not very different from the argument that was urged from the official benches in the matter of Back Bay reclamation. We were urged to spend more money on Back Bay because we were told that if we do not spend more money on Back Bay what we have spent will be an utter loss. I think the same argument might be utilised in this case, as well, and we can say that unless we spend a sufficient amount of money, to see that every child that enters a school reaches the fourth standard, what we have already spent upon him is of no purpose whatsoever (Ibid: p. 40 ).

डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक धोरणावर हल्ला चढवला आणि असाही युक्तिवाद केला की, जास्त शुल्क आकारल्याने केवळ शिक्षणाचे व्यापारीकरण होईल आणि यामुळे कनिष्ठ वर्ग शिक्षणापासून वंचित राहील.[3] त्यांच्या दृष्टीने शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी ही सरकारची असून सरकार कररूपाने जेवढा निधी गोळा करते, किमान तेवढा निधी सरकारने शिक्षणावर खर्च केला पाहिजे.[4]

उच्च शिक्षणाचे महत्त्व ओळखून आंबेडकरांनी मुंबईतील सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. मुंबई विद्यापीठ कायदा दुरुस्ती विधेयकावरील आपल्या एका भाषणात त्यांनी असा युक्तिवाद केला की, वास्तविक शिक्षणामुळे कनिष्ठ वर्गाला सर्वाधिक महत्त्वाचा असणारा असा भौतिक फायदा होत असतो. तरीही उच्च शिक्षणासाठी सर्व प्रकारचे भौतिक लाभ सोडून देण्यास ते तयार आहेत.

वासाहतिक सत्तेने भारतीयांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्यात पुढाकार घेतला नव्हता. भारताची एक वसाहत म्हणून शोषण करण्यासाठी असे शिक्षणधोरण वसाहतवाद्यांना अनुकूल होते. वासाहतिक सत्तेला अनुकूल अशा मूल्यांची पेरणी करण्यासाठी भारतीयांसाठी कला शाखेचे शिक्षण ब्रिटिशांना आवश्यक वाटले. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: कला

शाखेचे विद्यार्थी असले तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या शिक्षणाचे महत्त्व त्यांनी नाकारले नाही :

Education in Arts and Law cannot be of much value to the Scheduled Castes either to the graduates themselves or to the people. It has not been of very high value even to Hindus. What will help the Scheduled Castes is education of an advanced type in Science and Technology. But it is obvious that education in Science and Technology is beyond the means of the Scheduled Castes and this is why so many of them send their children to take up courses in Arts and Law. Without Government assistance, the field of Advanced Education in Science and Technology will never become open to the Scheduled Castes, and it is only just and proper that the Central Government should come forward to aid them in this connection (Ambedkar 2014 B: 426-427).

तत्कालीन राष्ट्रवादी पुढाऱ्यांचा कल हा ब्रिटिश सरकारवर दबाव निर्माण करून स्वहितासाठी शिक्षणाचा मर्यादित विकास घडवून आणणे याकडे होता. याउलट, बाबासाहेब आंबेडकरांचा कल हा शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याकडे होता.

**डॉ. आंबेडकर आणि उच्च शिक्षणातील 'गुणवत्ता' विरुद्ध 'संख्या'**

जागतिकीकरणाच्या युगात गुणवत्ता हा चर्चेचा विषय बनला आहे. नव्या वित्त भांडवलाच्या नावाखाली तयार होणाऱ्या नव्या जागतिक व्यवस्थेने गुणवत्तेच्या जुन्या संकल्पनेला नवसंजीवनी दिली आहे. गुणवत्तेच्या या पुनरुज्जीवित संकल्पनेमुळे आज उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सक्रिय असलेली नवी वगळवणुकीची धोरणे आणि पद्धती उदयास आल्या आहेत. याच युगात कॉर्पोरेट जगतापुरती मर्यादित असलेली गुणवत्तेची कल्पना नॅक (National Assessment and Accreditation Council) या संस्थेच्या माध्यमातून उच्च शिक्षणासाठी लागू होऊ लागली. नव्या साम्राज्यवादी व्यवस्थेला अनुरूप अशा रीतीने उच्च शिक्षणाची पुनर्रचना करणे, हे आता नवे ध्येय आहे.


जयभीम
Educate
Agitate
Orgnise
ART BY SUNIL ABHIMAN AWACHAR 20

अलीकडच्या काळात जनतेत उच्च शिक्षणाचा जो मर्यादित प्रसार झालेला आहे त्याला काही शिक्षणतज्ज्ञ 'स्वस्त लोकप्रियता' असे संबोधत आहेत. 'विद्यापीठ अनुदान आयोगा'चे माजी अध्यक्ष अरुण निगवेकर यांनी परिस्थितीचा चुकीचा अर्थ लावला: भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत लक्षणीय वाढ झाली आहे हे खरे आहे, पण हा नियोजित निरोगी विकास नाही. कारण आंधळ्या सामाजिक-राजकीय कार्यक्षमतेमुळे हा विकास झाला आहे. हेही खरे आहे की जवळजवळ पन्नास वर्षांच्या कालावधीत अशा अभूतपूर्व विस्तारामुळे सामान्य लोकांना व्यवस्थेत प्रवेश करण्याची परवानगी मिळाली आहे आणि वैयक्तिक प्रगती व गौरवासाठी त्याचा वापर करण्याखेरीज कोणतीही बांधिलकी नसलेल्या व्यक्तींकडून या प्रणालीचे व्यवस्थापन केले जात आहे (Nigavekar 2001:12). यावरून हे दिसून येते की शिक्षणाच्या 'शुद्धतेचे' आणि 'पावित्र्याचे' संरक्षण करण्याची गरज आहे, असा उच्चभ्रू लोकांचा अजूनही विश्वास आहे. उच्चवर्णीय उच्चभ्रू लोक शिक्षणाच्या जुन्या धार्मिक संकल्पनेला गोंजारत आहेत. उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील तथाकथित 'अनिमंत्रित' आणि 'अनभिज्ञ' कनिष्ठ जातींच्या आगमनाचा त्यांना सर्वाधिक तिरस्कार वाटतो. कारण या प्रक्रियेत आपण ज्याला उत्पादनाचे बौद्धिक साधन म्हणू शकतो त्यावरील स्वत:च्या वर्चस्वाला धोका आहे, असे त्यांना वाटते.

शिक्षणावर चर्चा करताना गुणवत्तेच्या विरोधात संख्या असा भ्रांत तर्क विकसित करण्याकडे विद्वानांचा तीव्र कल आहे. त्यांनी असे गृहीत धरले आहे की, संख्या ही गुणवत्तेच्या विरोधी आहे आणि संख्यात्मक वाढ ही आपोआपच गुणवत्ता खालावण्याचे कारण ठरते. संख्या आणि गुणवत्ता ह्या कल्पना परस्परांना वगळणाऱ्या आहेत की त्या परस्परांची घडवणूक करणाऱ्या आहेत? अधिकाधिक लोकांना विकासाची संधी उपलब्ध करूनच समाजाची एकंदर गुणवत्ता वधारता येते, हे भांडवली देशांच्या विकासावरून सिद्ध झालेले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतात शिक्षणाच्या गुणवत्तेची चर्चा सुरू झाली, पण एका वेगळ्या संदर्भात. वसाहतवादी राज्यकर्त्यांनी भारतातील शिक्षणाच्या गुणवत्तेबद्दल वारंवार शंका व्यक्त केली होती. गुणवत्तेचा अभाव असलेली जातीपातीची शिक्षणव्यवस्था बदलण्यासाठी त्यांना कसोशीने प्रयत्न करावे लागले. त्यांना बराच विरोध झाला; डेक्कन कॉलेजमधील ब्राह्मण शिक्षकांनी मराठी भाषेचे महान विद्वान मेजर कॅन्डी यांना

अधीक्षक पदावरून काढून टाकण्याचा कट रचला होता (Maharashtra State Archives: 77-71).

वसाहतवादी राज्यकर्त्यांनी सामाईक आणि समान परीक्षाप्रणाली सुरू केली होती. त्यांची शिक्षणव्यवस्था पूर्वीच्या व्यवस्थेत झालेल्या पूर्वग्रहांपासून मुक्त आहे, या कल्पनेचा प्रसार करण्याचा वसाहतवादी राज्यकर्त्यांचा उद्देश सामाईक आणि समान परीक्षाप्रणालीच्या माध्यमातून आपोआपच साध्य होणार होता. तथापि, वसाहतवादी नोकरशाहीच्या गरजेनुसार सुशिक्षितांची संख्या नियंत्रित करण्यासाठी त्यांनी परीक्षा पद्धत अत्यंत कठोर बनवली. विष्णुशास्त्री चिपळूणकर (१८५०-८२), धोंडो केशव कर्वे (१८५८-१९६२), गोपाळ गणेश आगरकर (१८५६-९५), बंकीमचंद्र चटर्जी (१८३८-९४) आदी राष्ट्रवादी विद्वान विद्यापीठाच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे राष्ट्रवादी नेत्यांनी परीक्षा व्यवस्थेच्या या अत्यंत प्रतिकूल स्वरूपाच्या विरोधात आवाज उठवला होता. स्ववर्गाच्या तरुणांना ब्रिटिशकालीन परीक्षा जड वाटायच्या म्हणून त्यांनी परीक्षेचे निकष शिथिल करण्याविषयी मागणी केली होती.

डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधानसभेतील एका भाषणात या मुद्द्यावर योग्य टिप्पणी केली. गुणवत्ता सुनिश्चित करण्याच्या सबबीखाली परीक्षायंत्रणा अधिक कठोर करण्याच्या मुंबई विद्यापीठाच्या निर्णयावर त्यांनी तर्काधिष्ठित टीका केली. परीक्षा अधिक कठोर बनवून शिक्षणाचा दर्जा सुधारता येणार नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला आणि त्यात सुधारणा करून शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत दोष निवारण्याच्या गरजेबद्दलही युक्तिवाद केला. ते म्हणाले :

There is no doubt about it in my mind and I do not think that those who represent the University will deny the fact that our system of examination is the severest possible that exists in India to-day. This is no doubt justified by certain educationalists in India who believe that raising of the standard of examination is equivalent to the raising of the standard of education. I beg respectfully to differ from them. Examination is something quite different from education, but in the name of raising the standard of education, they are making the examinations impossible and so severe that the backward communities which have hitherto not had the

chance to entering the portals of the University are absolutely kept out (Ambedkar 2014 A: 50).

विद्यापीठ प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयात त्यांना खालच्या जातींना शिक्षणक्षेत्रापासून दूर ठेवण्याची योजना दिसली.

शिक्षणात गुणवत्तेचा अभाव ही एक अत्यंत खेदजनक जुनी कथा आहे आणि देशभरात अनेक वर्षांपासून गुणवत्तेच्या मुद्द्यावर ओरड होत आहे. दिल्ली विद्यापीठात दक्षिण आशियाई शिक्षण परिषदेत अमर्त्य सेन म्हणाले,

''University education in India is in a state of crisis. It is not a crisis of lack of resources. It is a deterioration of quality. When it comes to higher education, there is no escape from seeking the highest quality we can get" (Ambroso 2000:iii).

त्यामुळे भारतातील शैक्षणिक क्षेत्रात 'सर्व काही चांगले होते', असे गृहीत धरण्यात धोका आहे. संख्येने अल्प असलेला उच्चवर्णीय उच्चभ्रू वर्ग; त्यांची मक्तेदारी निर्माण केलेल्या आणि अनेक अपप्रवृत्तींच्या असलेल्या शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण निर्माण करू शकला नाही, या वस्तुस्थितीचा उल्लेख आज गुणवत्तेच्या नावे टाहो फोडणारे करत नाहीत.

भारतातील संशोधनाच्या गुणवत्तेचा प्रश्न शैक्षणिक वर्तुळात अत्यंत दुर्लक्षित राहिला आहे. तसेच भारतातील अनेक विद्यापीठांचे कॅम्पस लैंगिक छळाचे ठिकाण बनले आहेत. भारतासारख्या देशात ही समस्या अधिक गंभीर असली पाहिजे; त्याबद्दल बोलूच नये यासाठी निर्माण केलेले अडथळे/यंत्रणा अधिक प्रभावी आहे. लैंगिक छळाचे खटले रोखण्यासाठी आणि शिक्षा देण्यासाठी विद्यापीठांना समित्या स्थापन करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही हे आदेश दुर्लक्षिले गेले आहेत.

उच्च शिक्षणाचा संपूर्ण सरकारी प्रायोजित प्रकल्प स्वातंत्र्योत्तर काळात उच्चवर्णियांनी हायजॅक केला होता. उच्च शिक्षण हे ऊर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेची शाश्वती देत असल्यामुळे उच्च शिक्षणाचे लाभ मिळविण्यासाठी उच्चजातीय हे आवेशाने पुढे आले होते आणि हेच लाभ कनिष्ठ जातींना मिळणार नाहीत, याची तजवीज त्यांनी केली होती.

भारतीय उच्च शिक्षणाचा दर्जा अतिशय निराशाजनक आहे, ही एक सुस्थापित वस्तुस्थिती आहे. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील मूलभूत संशोधनात भारतीय संशोधकांचे योगदान केवळ दोन टक्के आहे. जगातील सर्वोत्तम ५०० विद्यापीठांमध्ये केवळ ३ भारतीय विज्ञान आणि

तंत्रज्ञान विद्यापीठांचा समावेश करण्यात आला आहे. भारतातील विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बहुतांश सर्वोच्च संस्थांमध्ये उच्चवर्णीय बुद्धिवंतांचे वर्चस्व आहे, ही वस्तुस्थिती आहे. उच्च शिक्षणाची अवस्था दयनीय झाली आहे. कारण समाजाचा मोठा हिस्सा असणाऱ्या कनिष्ठ जातीतील जनतेला जाणीवपूर्वक शिक्षणाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहे.

**स्वतंत्र भारत : दिशाहीन शिक्षण**

भारतातील वसाहतवादानंतरचे शैक्षणिक धोरण हे केवळ वसाहतवादी शैक्षणिक धोरणाचा विस्तार होता. डॉ. राधाकृष्णन् यांच्या नेतृत्वाखाली १९४७ साली स्थापन झालेला पहिला शिक्षण आयोग विद्यापीठीय शिक्षणावर होता. सामाजिक, आर्थिक आणि इतर मतभेद कोणतेही असले तरी शिक्षण सर्व मुलांसाठी खुले असेल आणि पुरेसे मापदंड राखले जातील, अशी कल्पना 'कोठारी आयोगा'ने (१९६४) मांडली होती. आयोगाने ड्रॉप आऊटच्या समस्येकडेही लक्ष दिले होते आणि काही शिफारशी सुचवल्या होत्या. तथापि, अनेक आयोग आणि अनेक आश्वासने देऊनही भारत आणि महाराष्ट्रात ड्रॉप आऊटची समस्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. जात आणि पितृसत्ता हे भारतात ड्रॉप आऊटचे दोन महत्त्वाचे निर्धारक आहेत.

विविध वर्गांच्या गरजा पूर्ण करणे आणि जातिग्रस्त भारतीय समाजात असमान भांडवलदारी विकास घडवून आणणे, ह्या गरजा भारतातील बहुस्तरीय शिक्षणव्यवस्थेद्वारा पूर्ण होत होत्या. अमेरिका आणि अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्येही सर्वसमावेशक शालेय प्रणाली (ज्याला सामान्य शालेय प्रणाली किंवा एकसंध शालेय प्रणाली असेही म्हणतात.) प्रचलित आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे भारताच्या संदर्भात विचार करता शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात पूर्णपणे अपयश आले आहे. 'प्रोब अहवाला'ने (बेसिक एज्युकेशनचा पब्लिक रिपोर्ट-१९९९) प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तेच्या मिथकाचा स्फोट झाला आहे. भारतीय शालेय व्यवस्थेत कार्यरत असलेल्या सामाजिक भेदभावाचे प्रकार उघडकीस आल्याचे तपासात नमूद करण्यात आले आहे. भारतात सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या भारतीय प्रौद्योगिकी संस्था, खडगपूर संस्थेतही शिक्षक विद्यार्थ्यांना जातीयवादी वागणूक देतात (Singh 2021). भारतातील इंजिनिअरिंग

महाविद्यालयांतील जातीयवादाविषयी अजंता सुब्रमणियम यांचा अभ्यास उद्बोधक आहे (Subramaniam 2019).

भारतीय संविधानात गौरविलेली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यात भारतातील जातीय-वर्गीय-लैंगिक विषमता हा आजही एक मोठा अडथळा आहे. भारतात प्रचलित असलेल्या विलक्षण प्रकारच्या विषमतेकडे दुर्लक्ष करणारा सुधारणावाद शिक्षणव्यवस्थेत बदल करण्याचे धाडस करू शकत नाही. 'सर्व शिक्षा अभियाना'तील निर्धारित आदर्शवाद ड्रॉप आऊटच्या समस्येला रोखू शकला नाही, असे या अभ्यासात आढळून आले आहे. भारतात युनेस्कोची (२००६) आकडेवारी दाखवते :

१. २००२ मध्ये शाळेत जाणाऱ्या मुलांचा निव्वळ नोंदणी दर ८८ टक्क्यांवर पोहोचला.

२. वयाच्या १० व्या वर्षापर्यंत फक्त ६१ टक्के मुले शाळेत टिकून राहिली.

३. ड्रॉप आऊट रेट ३९ टक्के एवढा आहे.

राज्यांमध्ये आणि सामाजिक गटांमध्ये प्रचंड फरक आहे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसारख्या सामाजिकदृष्ट्या वंचित गटांमध्ये नावनोंदणीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. अनुसूचित जातींची ५० टक्के आणि अनुसूचित जमातींची ५६ टक्के एवढया मुलांची नावनोंदणी झाली होती.

ड्रॉप आऊटची सध्याची समस्या एखाद्या पोकळीत निर्माण झालेली नाही. जात, वर्ग आणि पितृसत्ता यांचा व्यापक प्रसार या समस्येच्या वाढत्या स्वरूपाला प्रामुख्याने जबाबदार आहे. जात, वर्ग आणि पितृसत्तेशी व्यापक संबंधाच्या संदर्भात अभ्यास केल्याशिवाय या समस्येचे योग्य आकलन करता येणार नाही.

'सर्व शिक्षा अभियान' (प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा कार्यक्रम) हे २०००-०१ मध्ये सुरू करण्यात आले. दुपारचे जेवण, मोफत पाठ्यपुस्तके, हजेरी भत्ता, स्टायपेंड, शिक्षक प्रशिक्षण असे अनेक प्रेरणादायी कार्यक्रम सुरू करण्यात आले. मात्र, या सर्व प्रयत्नांमुळे ड्रॉप आऊटचे प्रमाण आणि सतत खालावत चाललेली गुणवत्ता थांबवण्यात अपयश आले.

अध्ययन-अध्यापनाच्या पद्धतीत क्षुल्लक बदल घडवून आणण्यात 'सर्व शिक्षा अभियाना'ला यश आल्याचे आढळून आले आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीनंतरही शिक्षणाची मूलभूत रचना कायम

आहे. जोपर्यंत आपण शिक्षणाला 'मसल-मनी-प्रेस्टीज' यापासून वेगळे करत नाही, तोपर्यंत 'स्वातंत्र्य-स्वयंपूर्णता-संधी' या तत्त्वांवर शिक्षणाला अधिष्ठित करण्याची आशा करणे कठीण आहे. सर्व मुलीमुलांना शिक्षणाची समान संधी निर्माण करणे आणि त्यांनी त्यांच्या छुप्या क्षमतांचे मुक्त प्रकटीकरण करणे गरजेचे आहे.

वर उल्लेख केलेल्या निष्कर्षांवरून असे दिसून येते की, ग्रामीण भागातील शाळांमध्ये जात आणि पितृसत्ता हे प्रमुख निर्धारक आहेत. जात, वर्ग आणि लैंगिक भेदभाव यांच्या व्यापक अस्तित्वामुळे सामान्य जनतेचे जीवन अधिक असह्य होत आहे. ग्रामीण भागात मूलभूत सुविधा आणि उपजीविकेच्या साधनांचा अभाव असल्याने पालकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. किमान गरजांची पूर्तता करण्यासाठी त्यांना दिवसाचे १६ ते १८ तास काम करावे लागते. आई-वडिलांसोबत मुलांनाही कष्टांची कामे करावी लागतात. अशी निराशाजनक परिस्थिती बदलल्याशिवाय 'ड्रॉप आऊट'ची समस्या थांबण्याची अपेक्षा आपण करू शकत नाही.

अध्यापन-अध्ययनाच्या पद्धतीत केवळ क्षुल्लक बदल घडवून आणण्यात सर्व शिक्षण अभियानाला यश आल्याचे आढळून आले आहे. भारतीय संविधानात उल्लेखिलेली शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यात भारतातील जातीय-वर्ग-लिंगविषमता हा आजही एक मोठा अडथळा आहे. गेल्या काही दशकांत भारताच्या औपचारिक शिक्षणव्यवस्थेचा प्रचंड विस्तार झाला असला तरी ६ ते १४ वयोगटातील सुमारे ५० ते ६० दशलक्ष मुले किंवा प्राथमिक शिक्षणाला अनुकूल वयोगटातील एकूण मुलांच्या संख्येच्या सुमारे पंचवीस टक्के मुले शिक्षणापासून वंचित असण्याची शक्यता आहे. २०११-च्या जनगणनेनुसार भारतात पाच ते सतरा या वयोगटातील एकूण ८.४ कोटी मुले शाळेबाहेर आहेत (Dubey 2018).

भारताला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे उलटून गेली असली तरी बहुतेक अभ्यासक हे भारताचे शिक्षण अभ्यासक दिवंगत जे. पी. नाईक यांच्या "the goal of universal primary education remains as elusive as ever before." (सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे ध्येय पूर्वीइतकेच आजही अप्राप्य राहिलेले आहे) या मताशी सहमत असतील. भारत सरकारच्या मते, १९७९मध्ये सहा ते चौदा वयोगटातील ४.२ कोटी मुले होती — किंवा बत्तीस टक्के मुले — शाळेत नव्हती, पण भारतीय जनगणनेच्या ड्रॉप आऊटसंबंधीच्या आकडेवारीनुसार अनुपस्थित विद्यार्थ्यांचे प्रमाण जवळजवळ दुप्पट झाले होते (Weiner 1991: 6).

भारताचा साक्षरता दर जगातील सर्वात अविकसित प्रदेश असलेल्या सब-सहारन आफ्रिकेच्या मागे आहे, याकडे अमर्त्य सेन यांनी लक्ष वेधले आहे :

Literacy rates in India are much lower than in China, lower than literacy rates in many east and south-east Asian countries at the time of their rapid economic expansion thirty years or so ago. They are lower than the average literacy rates for 'low-income countries' other than China and India, and also no higher than estimated literacy rates in sub-Saharan Africa (Mani 2005 : 412).

अनेक दशकांपासून एकूण बालकांच्या संख्येहून निम्मी मुले म्हणजे सुमारे आठ कोटी मुले आणि चाळीस कोटी प्रौढ अशिक्षित किंवा अर्धशिक्षित आहेत. इतक्या मोठ्या संख्येने अशिक्षित; भारतातील श्रमप्रेरित उत्पादन प्रणाली आणि बाजारपेठेत श्रमाची गरज पूर्ण करतात. यातून आणखी एक राजकीय कार्य साध्य होते : कनिष्ठ जाती आणि जमाती ह्या आपोआपच जातिव्यवस्थाक तुरुंगात बंदिस्त राहतात. आंबेडकरांचे अनुसरण न केल्यामुळे भारतीय उच्चभ्रू जनतेने भारतीय सर्वसामान्य जनतेला मोठी किंमत मोजायला लावलेली आहे.

टिपा आणि संदर्भ :

1. 'The Government should stop all grants to the Education Department as they do not serve any useful purpose and divert them instead to the collectorate and compel each European collector, unlike George Jervis, to impartially select intelligent students from all castes, open schools for them near the collector's bunglow, provide them with simple food and clothing....' (Deshpande 2002: 81).
2. 'The object of primary education is to see that every child that enters the portals of a primary school does leave it only at a stage when it becomes literate and continues to be literate throughout the rest of his life.... I therefore request the

Honourable the Education Minister to spend more money on primary education, if for nothing else at least for the purpose of seeing that what he spends bears some fruit ultimately.' (Ambedkar 2014 A : 40).

3. 'Going over the figures which give us information as to the manner by which we finance education in this presidency I find that out of the total expenditure which we incur on arts colleges, something like 36 per cent is financed from fees; out of the expenditure that we incur on high schools, something like 31 per cent is financed from fees; out of the expenditure that we incur on middle schools, something like 26 per cent. is derived from fees. Now, Sir, I submit that this is commercialisation of education. Education is something, which ought to be brought within the reach of every one. The Education Department is not a department, which can be treated on the basis of *quid pro quo*. Education ought to be cheapened in all possible ways and to the greatest possible extent. I urge this plea because I feel that we are arriving at a stage when the lower orders of society are just getting into the high schools, middle schools and colleges, and the policy of this department therefore ought to be to make higher education as cheap to the lower classes as it can possibly be made.'( Ambedkar 2014 A: 40-41).

4. 'I may say so, in the reverse direction. Sir, I think that it is not asking too much if I plead that we should at least spend on education the same amount that we take from the people in the form the amount of money that we recover in the form of excise revenue is Rs. 9-2-2 (Rs. 2.17), I think it is only fair that our educational expenditure should be so adjusted that we should spend on the education of the people as much as we take from them in the form of excise. of excise revenue. The amount of expenditure that we incur per individual in this presidency on education is only 14 annas, but the amount of

money that we recover in the form of excise revenue is Rs. 9-2-2 (Rs. 2.17), I think it is only fair that our educational expenditure should be so adjusted that we should spend on the education of the people as much as we take from them in the form of excise.' ( Ambedkar 2014 A: 39- 40).

5. 'This is not the view held in India. Primary education in India is not compulsory, nor is child labor illegal. The result is that less than half of India's children between ages six and fourteen—82.2 million—are not in school. They stay at home to care for cattle, tend younger children, collect firewood, and work in the fields. They find employment in cottage industries, tea stalls, restaurants, or as household workers in middle-class homes. They become prostitutes or live as street children, begging or picking rags and bottles from trash for resale. Many are bonded laborers, tending cattle and working as agricultural laborers for local landowners. "The government," a senior education official told me, "should not force poor parents to send their children to school when it cannot provide employment for all adults. Children are an economic asset to the poor. The income they bring in and the work they do may be small, but parents close to subsistence need their help.' (Weiner 1991:3)

**मराठी :**

१. गायकवाड, प्रदीप (२००८)(संपा) : *दलितांचे शिक्षण: डॉ. भीमराव रामजी आंबेडकर*, (प्र. आ. १९९४), क्षितिज प्रकाशन, नागपूर.

**इंग्रजी :**

1. Ambedkar, B. R (2014 A) : 'On Grants for Education', *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches* Vol. 2, Vasant Moon (Ed.), (F. ed 1982), Education Department, Mumbai.
2. Ambedkar, B. R. (2014 B): 'Educational Grievances', *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches* Vol. 10, Vasant Moon (Ed.) (F.ed.1991), Education Department, Mumbai.

3. Ambedkar, B. R (2019): *Annihilation of Caste* Retrieved April 20, 2021 From http://drambedkarwritings.gov.in/upload/uploadfiles/files/Volume_01.pdf

4. Anagol, Jayakumar (n.d): *Compulsory Primary Education: Opportunities and Challenges,* Centre For Multi- Disciplinary Development Research, Dharwad. Retrieved April 20,2021 From http://cmdr.ac.in/editor_v51/assets/mono-22.pdf

5. Cooper, J. P(1967): 'The Social Distribution of Land and Men in England, 1436-1700', *Economic History Review* XX: 3.

6. Deshpande, G. P (2002) (ed.): *Selected Writings of Jotirao Phule,* Leftword Books, New Delhi.

7. Dubey, Muchkund and Others (2018): 'Still Too Many Children Out Of School', *The Hindu*, 4 September, Retrieved April 30,2021 From https://www.thehindu.com/opinion/op-ed/still-too-many-children-out-of-school/article24857149.ece

8. Fanon, Frantz(1974): *The Wretched of the Earth,(* F.ed.1963), Penguin Books, Middlesex.

9. Forrest, George W (1884) (Ed) : *Selections from the Minutes and Other Official Writings of the Honourable Mountstuart Elphinstone,* Richard Bentley and Son, London.

10. Maharashtra State Archives. G.D. Vol. 39/409, pp. 71-77.

11. Mani, Braj Ranjan (2005): *Debrahminising History: Dominance and Resistance in Indian Society*, Manohar, New Delhi.

12. Minor, Robert N(1997): 'Radhakrishnan as Advocate of the class/caste system as a universal religio-social system' *International Journal Hindu Studies* 1:2, August 1997.

13. Nigavekar, Arun (2001): 'Quality in Higher Education', *University News*, 39. 19.

14. Pinto, Ambroso (2000): 'Editorial', *Social Action: A Quarterly Review of Social Trends,* 50.4

15. Singh, Yuvraj(2021): 'Why Indian Teachers Must Become Anti-Caste Practitioners First', *The Wire*, 28 April, Retrieved April 30, 2021 From https://thewire.in/caste/why-indian-teachers-must-become-anti-caste-practitioners-first
16. Subramaniam, Ajanta(2019): *The Merit of Caste,* Harvard University Press, Harvard.
17. Weiner, Myron (1991): *The Child and the State in India,* Princeton University Press, New Jersey.

संक्षाभिज्ञ

# क्रमयोग

**मानसी वाळिंबे**

व्याख्याता
श्री. बन्सीधर अग्रवाल जुनिअर कॉलेज, वडाळा
manasi.walimbe@gmail.com

‘नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी॥’

*ज्ञानेश्वरी* हा मराठी साहित्यात अजोड मानला जाणारा ग्रंथ. गेली अनेक वर्षे या ग्रंथाची अनेक रूपे जनमानसात स्थिर झालेली आहेत. वारकरी संप्रदायाचा पायाभूत ग्रंथ आणि एक अप्रतिम कलाकृती या दोन्ही अंगांनी ती वाचकांसमोर येते. सर्वसामान्य लोकांना *भगवद्गीता* कळावी, यासाठी ज्ञानेश्वरांनी लिहिलेला हा ग्रंथ एक सुंदर काव्यकृती म्हणून वाचक-अभ्यासकांसमोर येतो. त्यामुळे संपूर्ण *गीता* ही *ज्ञानेश्वरी*त सुबोध तर होतेच, शिवाय एक अजोड साहित्यकृती म्हणून उमटते, याचे कारण संत ज्ञानेश्वरांची काव्यात्मकता, रसिकता आणि सौंदर्यवृत्ती होय.

ज्ञानेश्वर हे अतिशय प्रतिभावंत कवी म्हणून *ज्ञानेश्वरी*त जागोजागी जाणवतात. *ज्ञानदेवांचा गीतासंवाद* या पुस्तकात डॉ. वि. रा. करंदीकर म्हणतात, ‘ज्ञानदेवांच्या प्रतिभेला स्फुरण येण्यास छोटेसे निमित्त पुरते. तात्काळ त्यांची वाणी समोर येणाऱ्या विषयाशी मन तन्मय होऊन काव्यसौंदर्याचे मनोहर रूप घेऊन उभी राहते; याची प्रचिती ज्ञानेश्वरीत जागोजाग मिळते’ (करंदीकर २०१३ : १८).

*गीते*चा अठरावा अध्याय म्हणजे *एकाध्यायी गीता* (ज्ञानेश्वरी १९९८ : ओवी. क्र. १८.८४ : ७४२). ज्ञानेश्वर म्हणतात, ‘अर्जुनाचा आत्मतत्त्वाविषयी निश्चय झाला, असे सांगितले तर आता श्रीकृष्ण काही बोलणार नाही म्हणून त्याला बोलता करून संवादसुख भोगण्यासाठी अर्जुनाने प्रश्न विचारला; आणि जणू *गीता* परतवून आणली’ (तत्रैव, ओवी. क्र. १८.८५, पृ. ७४२). गुरुशिष्य नात्यातला संवादाचा गोडवा अनुभवण्यासाठी हा अठरावा अध्याय आहे, ही ज्ञानेश्वरांची संगती.

ब्रह्मरूप होण्यासाठीचा प्रवास पुन्हा एकदा *गीते*च्या १८.५० ते १८.५६ ह्या श्लोकांतून सांगितला जातो. *गीते*च्या ह्या श्लोकांवर निरूपण करताना, शिष्य गुरुरूप म्हणजेच ब्रह्मरूप होतो; त्या प्रसंगाचे वर्णन ज्ञानेश्वर अनेक दृष्टांतांना गुंफत विस्ताराने करतात.

‘सिद्धी प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोती निबोध मे, समासेनैव निष्ठा ज्ञानस्य या परा’ (गोयदन्का २०१७ : १८:५०, ४४८) *गीते*मधील या श्लोकावरील *ज्ञानेश्वरी*तील त्यांच्या ओव्या वाचताना ‘क्रम’ हा शब्द लक्ष वेधून घेतो. कर्म, उपासना आणि ज्ञान ह्यांचे सांगोपांग विवरण करून झाल्यावर ग्रंथ समाप्तीच्या वेळी ज्ञानप्राप्तीसाठीच्या पायऱ्या पुन्हा अधोरेखित केल्या

आहेत. हा क्रमयोग आणि क्रमयोगी ह्यांचे वर्णन *भगवद्गीते*च्या ५० ते ५५ या श्लोकांवरील *ज्ञानेश्वरी*तील निरुपणात आले आहे. क्रमयोग स्पष्ट करून सांगताना ज्ञानेश्वर अनेक उपमा-दृष्टांत देतात. अनुभवाच्या कक्षेबाहेरील विषय तसेच तत्त्वज्ञानातील गहन सिद्धांत सामान्य माणसाला आकलनाजोगे करणे, हे या उपमा-दृष्टांताचे कार्य. असे दृष्टांत देणे हा ज्ञानेश्वरांचा विशेष आहे.

कर्मयोग ही संज्ञा अनेकवेळा वाचनात येते, **क्रमयोग** ही संज्ञा प्रथमच समोर येते आणि त्यामुळेच कदाचित उत्सुकता निर्माण होते की क्रमयोग म्हणजे काय?

१. ‘क्रम’ या शब्दाचा वाच्यार्थाने जो अर्थ प्रतीत होतो तोच अर्थ, क्रम म्हणजे ओळ किंवा पायऱ्या या अर्थी आणि ‘योग’ या शब्दाची निर्मिती ‘युज्’ धातूपासून झालेली असून ‘जुळणी’ या अर्थाने हा शब्द वापरला जातो. थोडक्यात, क्रमयोग म्हणजे पायरी-पायरीने, क्रमाक्रमाने जीव आणि परमात्मा यांची जुळणी किंवा ऐक्य होणे. हा क्रमयोग *ज्ञानेश्वरी*मध्ये संत ज्ञानेश्वरांनी विस्तारपूर्वक सांगितला आहे.

२. ज्ञानेश्वर, *ज्ञानेश्वरी*तील तिसऱ्या अध्यायात एक दृष्टांत देतात, पक्षी उडता येत असल्याने सहज फळापर्यंत जाऊन पोहोचतो तसा ज्ञानमार्गाचा आश्रय करून ज्ञानी त्या क्षणीच मोक्ष आपल्या स्वाधीन करून घेतात. दुसरे जे त्यांच्याइतके ज्ञानी नाहीत, ते कर्मयोगाच्या आश्रयाने *वेदा*त सांगितलेला आपला आचारच पाळून काही काळाने पूर्णतेस पोहोचतात. प्रत्येकाची ध्येयापर्यंत पोहोचण्याची पात्रता वेगळी असली तरी आपापल्या कुवतीनुसार पायऱ्या-पायऱ्यानी मार्गक्रमण करत आपल्या ध्येयापर्यंत नक्की पोहोचता येते, हे ज्ञानेश्वर सहज सांगून जातात. इथे क्रमयोगाचा स्पष्ट उल्लेख नाही. क्रमयोग असा स्पष्ट उल्लेख *ज्ञानेश्वरी*तील अठराव्या अध्यायात दिसून येतो.

३. *भगवद्गीते*च्या अठराव्या अध्यायातील पन्नासाव्या श्लोकाचे *ज्ञानेश्वरी*त निरूपण करताना ज्ञानेश्वर म्हणतात, ‘ज्ञानाची अखेरची मर्यादा असे जे ब्रह्म, ते सिद्धी पावलेला अधिकारी पुरुष, कोणत्या क्रमाने मिळवतो, ते संक्षेपाने माझ्यापासून श्रवण कर.’ या ठिकाणी ज्ञानेश्वर सांगतात की नैष्कर्म्यस्थिती प्राप्त

होऊन परब्रह्मपद प्राप्त होण्याची परमोच्च स्थिती किंवा अवस्था एकदम आत्मसात होत नाही. ती पायरी-पायरीने प्राप्त करावी लागते. साधकाने ज्ञानाच्या ज्या उत्कर्षाने आत्मसाक्षात्कार होईल, ते सर्व प्रयत्नपूर्वक प्राप्त केले. गुरूंनी ज्ञानोपदेश केला तरीही ब्रह्मपद लगेच मिळत नाही. थोडक्यात, वैराग्याची प्राप्ती होऊन गुरुपदेश झाला, अंतःकरणात नित्य - अनित्य विचार अंकुरला. त्यामुळे ब्रह्म हे एकमेव सत्य आहे, बाकी सारी भ्रांती आहे, असा अनुभव दृढ झाला. परंतु जे सर्वात्मक व सर्वात उत्तम आहे, तेच परब्रह्म. त्या मोक्षाचेही प्रयोजन ज्या ब्रह्माच्या अनुभवात नाहीसे होते, जे ज्ञान आपल्या पोटात जागृती, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्था नाहीशा करते, त्या ज्ञानालाही नाहीसे करणारी जी वस्तू– 'ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंद्कणुही विरे। कांहींचि नुरोनि उरे। जें कांहीं गा।। तिये ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊन असणें। ते क्रमेंचि करून तेणें। पाविजे पैं।। (तत्रैव, पृ. ८१२, ओवी क्र.१८:१००५-६) - म्हणजेच ऐक्याचे एकपण ज्या ठिकाणी संपते व आत्मदर्शनात प्रथम होणारा आनंदकण तोही ज्या ब्रह्मस्वरूपात विरून जातो व काही न उरता जे शिल्लक असते, त्या ब्रह्माच्या ठिकाणी ब्रह्मच होऊन ऐक्याने असणे, त्या साधकाकडून क्रमाने मिळवले जाते.

४. ज्ञान प्राप्त होऊन ब्रह्माशी एकरूप होण्यासाठी ज्या ज्या साधनांचा अवलंब करावा लागतो त्यांचा उल्लेख ज्ञानेश्वर पुढच्या काही ओव्यांमध्ये करतात. गुरूने दाखवलेल्या मार्गावर चालताना साधकाने आपल्या बुद्धीचा मळ काढून टाकून आपली बुद्धी शुद्ध करणे, इंद्रिय नियमन करून शब्दादिक पंच विषयांचा निरास करणे व वासनांसह विषयांचा त्याग करणे, शुद्धीकारक प्रायश्चित्ते करून शुद्ध केलेली इंद्रिये मनासह सात्त्विक धैर्याच्या जोरावर योगधारणेला लावणे, मनातील अभिलाषा, प्रीती, द्वेष हे सर्व सोडून देऊन एकांती दूर डोंगरात किंवा अरण्यात राहणे, मौन धारण करून केवळ शरीर जगवण्याइतकेच अन्न खाणे, आळस सोडून देऊन केवळ देहाचा निर्वाह होण्याइतकेच हातपाय हलवणे इत्यादी. थोडक्यात, आपल्या वृत्तीला संकल्प-विकल्प करू न देता शरीर, वाणी आणि मन जिंकून साधक

केवळ ध्यान करतो. ध्यान, ध्येय व ध्याता या तिहींची एकरूपता होईपर्यंत ते ध्यान केले असता तो साधक आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेण्याइतका तत्पर झाला. याशिवाय कुंडलिनी जागृती, सुषुम्ना नाडीचा विकास, आधारचक्रापासून ते आज्ञाचक्रापर्यंत चक्रांचे भेदन इत्यादी योगाभ्यास (अष्टांगयोग) चांगला दृढ करून ब्रह्मस्वरूपाचे ध्यान सिद्ध केले. म्हणजेच तो साधक वैराग्याबरोबरच ज्ञानाभ्यास करून आत्मप्राप्तीला योग्य होतो. अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध व परिग्रह हे सर्व टाकून ममत्वबुद्धीविरहित व शांत झालेला असा साधक ब्रह्मरूप होण्याला योग्य होतो.

५. आत्मस्वरूपाचे ऐश्वर्य भोगावे इतक्या योग्यतेची सिद्धी ज्याने प्रयत्नपूर्वक मिळवली आहे तो साधक, आत्मवस्तूशी एकरूप होऊन जाण्याच्या अलीकडच्या पायरीवर उभा असतो, हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'सांगरींही पाणी वेगें। संचरें तें रूप गंगे। येर निश्चळ जें उगें। तें समुद्र जैसा।। ब्रह्म आणि ब्रह्महोतिये। योग्यतें तैसा पाडु आहे। तेचि शांतीचेनि लवलाहें। होय तो गा।। (तत्रैव, ओवी क्र. १८:१० ८८-८९, पृ. ८१८) आत्मज्ञानाच्या लाभामुळे चित्त प्रसन्न झालेले असते, दुःख, शोक, माया किंवा कोणतीही वासना मागे पडलेली असते आणि संपूर्ण विश्व या ज्ञानी साधकाला समान होऊन गेलेले असते. 'तेवीं उठतिया आत्मप्रथा। हे भूतभेदव्यवस्था। मोडीत मोडीत पार्था। वास पाहे तो।।' (तत्रैव, ओवी क्र.१८:१०९८, पृ. ८२०) म्हणजेच आत्मानुभवाचा उदय होताक्षणीच ही प्राणिमात्रांच्या भेदाची रचना नाहीशी करीत करीत, तो जिकडे तिकडे आपल्या स्वरूपाला पाहत जातो. इंद्रियगोचर विश्व पाहणे, त्यांचे भान असणे, ही अवस्था मागे टाकून त्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या बळावर तो आत्मवस्तूच्या ठिकाणीच प्रवेश करतो. 'तैसा बोध्यजात गिळितु। बोधु बोधें ये मज आंतु। मिसळला तेथ साद्यंतु। अबोधु गेला।।' (तत्रैव, ओवी क्र. १८.११०६, पृ. ८२०) पदार्थमात्र नाहीसे करणारे जे ज्ञान, त्या ज्ञानाने तो माझ्या स्वरूपी येतो व माझ्या स्वरूपात तो ऐक्याला पावला असता साद्यंत अज्ञान नाहीसे होते. बोध म्हणजे ज्ञान. अबोध या अर्थाने

अज्ञान. सर्वव्यापक आत्मवस्तू ज्ञानस्वरूप आहे. म्हणजेच अद्वैतानुभवाच्या अंतिम पायरीशी येऊन पोहोचलेला साधक तत्त्वतः ज्ञानस्वरूप आहे. त्याला अद्वैताचा अनुभव येणे म्हणजे बोधाने बोधाच्या साहाय्याने बोधाच्या ठिकाणी प्रवेश करणे होय, असे ज्ञानेश्वर सांगतात.

६. 'हेंही असो चेइलया। तें स्वप्न नाहीं जालिया। मग आपणचि आपणयां। उरिजे जैसे।। तैसा मी एकवांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं। हे चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे।। (तत्रैव, ओवी क्र. १८.१११०-११, पृ. ८२०) म्हणजेच पूर्ण जागे होऊन स्वप्न नाहीसे झाल्यावर आपणच आपल्याला जसे उरतो त्याप्रमाणे त्या ज्ञानी पुरुषाच्या दृष्टीने तो त्याच्यासह नाहीसा होऊन जातो व एक परब्रह्माशिवाय तेथे काहीच वेगळेपणाने उरत नाही. ही अनुभूती किंवा अवस्था म्हणजेच चौथी भक्ती होय.

*गीता-ज्ञानेश्वरी*च्या सातव्या अध्यायात आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, आणि ज्ञानी असे भक्तांचे चार प्रकार सांगितले आहेत. (भगवद्गीता : २०१७ :१९९ : ७:१६) त्यातील ज्ञानी भक्ती ती ही चौथी भक्ती आहे. 'एऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती। पै माझिये सहजस्थिती। भक्ति नांव।।' (तत्रैव, ओवी क्र. १८.१११३, पृ. ८२०) म्हणजेच ही भक्ती ना तिसरी ना चौथी, ना पहिली ना शेवटची कारण ही माझी सहज-स्वरूप स्थिती आहे, जिचे नाव भक्ती आहे. 'समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्।।' (भगवद्गीता : २०१७ : ४५१ : १८:५४) या भगवान श्रीकृष्णांच्या उद्गारालाच ज्ञानेश्वर चौथी म्हणजेच 'परा' भक्ती म्हणतात. हिचे स्वरूप स्पष्ट करताना 'स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसे आपलेनि असलेपणें। विश्वींचें आहे नाहीं जेणें। प्रकाशे तैसें।। ऐसा हा सहज माझा। प्रकाशु जो कपिध्वजा। तो भक्ति या वोजा। बोलिजे गा।।' (तत्रैव, ओवी क्र. १८.१११६-१७, पृ. ८२०) म्हणजेच स्वप्न पडणे किंवा न पडणे हे पाहणाऱ्याच्या अस्तित्वावर अवलंबून असते. स्वप्न पडते तेव्हा आपण असतो आणि जेव्हा ते पडत नाही तेव्हा आपण नसतो, असे म्हणता येत नाही. त्याप्रमाणे विश्व असणे किंवा नसणे, या द्वंद्वाच्या पलीकडे जाऊन आत्म्याचे 'असलेपण' म्हणजेच माझा सहज प्रकाश आहे, असे ज्ञानेश्वर सांगतात. त्यामुळेच विश्व प्रकाशित करणारा आत्मतत्त्वाचा प्रकाश या भक्तीच्या रूपाने असल्यामुळे आर्त भक्ताच्या ठिकाणी असणारी उत्कट

इच्छा, जिज्ञासू भक्ताच्या ठिकाणी असणारी आत्मप्राप्तीविषयीची जिज्ञासा किंवा अर्थार्थी भक्ताच्या ठिकाणी असणारी प्रार्थना, हे सारे या चौथ्या भक्तीचेच रूप आहे. 'तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें भक्ति इया। परी दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें।। तें अज्ञान आतां फिटलें। माझें दृष्टत्व मज भेटलें। निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें।। (तत्रैव, ओवी क्र. १८.११२३-२४, पृ. ८२०-८२१) म्हणजेच आरशात प्रतिबिंब दिसते. परंतु मुख हे मूळ स्वरूपात एकच असते. आरशामुळे ते बिंब व प्रतिबिंब या द्वैत स्वरूपात दिसते. आरसा बाजूला गेल्यावर दृश्य स्वरूपात दिसणारे प्रतिबिंब नाहीसे होते, त्याप्रमाणे अज्ञानामुळे आभासरूपी दृश्यत्व नाहीसे होते, दृष्टा व दृश्य हे द्वैत नाहीसे होऊन आत्मा आपल्या सहजस्थितीला म्हणजेच ज्ञानस्वरूपाला प्राप्त होतो. म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात की, चौथी म्हणजे ज्ञानी पुरुषाला लाभणारी परा भक्ती ही दृश्यरूप मार्गाच्या पलीकडे नेणारी आहे. ही उत्तम भक्ती असून ज्ञानी या चौथ्या भक्तीला 'स्वसंविती' म्हणतात, शैव हिला शक्ती म्हणतात, आणि आम्ही परम भक्ती म्हणतो. (तत्रैव, ओवी क्र. १८:११३३, पृ. ८२१) ही भक्ती प्राप्त झाल्यावर तो क्रमयोगी आत्मतत्त्वाशी एकरूप होऊन जातो आणि साध्य व साधन यांच्यापलीकडील शुद्ध आत्मतत्त्व भोगतो. याहीपुढे जाऊन ज्ञानेश्वर म्हणतात, ही भक्ती कर्मातीत आहे. अद्वैतानुभावाशी पोहोचल्यानंतर घडणारी ही भक्ती आहे. त्यामुळे हा क्रमयोगी परमात्मस्वरूपाने पूर्ण भरून जाऊन सर्व बाजूंनी मलाच प्राप्त होतो, माझ्याशी ऐक्य पावतो.

### *ज्ञानेश्वरी*तील भाषासौंदर्य

वरील प्रकारे ज्ञानेश्वर क्रमयोगाचे विवेचन करत असताना ज्या अनेकविध उपमा, दृष्टांत आणि रूपकांचा वापर करतात, ते वाचत असताना त्यांच्या काव्य-प्रतिभेची श्रीमंती जागोजागी दिसून येते. उदाहरणार्थ, गुरुवाक्याबरोबर ब्रह्मस्वरूप होणे कसे असते, हे स्पष्ट करताना ते म्हणतात, 'उदयजताचि दिनकरु। प्रकाशुचि आते आंधारु। का दीपसंगे कापुरु। दिपुचि होय।। तया लवणाची कणिका। मिळतखेवो उदका। उदकचि होऊनि देखा। ठाके जेवी।।' (तत्रैव,ओवी क्र.१८:९८५-८६,पृ. ८१२) सूर्य उगवला की अंधार नाहीसा व्हावा, दिव्याच्या संगतीत कापूर दिवाच होतो, मिठाचा खडा पाण्यात मिळाला की पाणीच होतो.

साधक क्रमाक्रमाने आत्मस्वरूप होत जातो, हे सांगताना ज्ञानेश्वर एकच दृष्टांत विविध दृष्टिकोनांतून कसा देतात ते पाहण्याजोगे आहे. उदाहरणार्थ,

आत्मस्वरूपाचा गुप्त ठेवा साधकाला उघडा होतो, हे सांगताना ते म्हणतात, ‘भुकेलियापासीं। वोगरिलें षड्रसीं। तो तृप्ति प्रतिग्रासीं। लाहे जेवीं।। (तत्रैव, ओवी क्र. १८.१००७, पृ. ८१२) ब्रह्मस्वरूप होण्याची पात्रता पात्र झालेला पुरुष ब्रह्मरूपाने प्राप्त झालेल्या आत्मानुभवाच्या प्रसन्नतेच्या पदावर बसतो, हे सांगताना ते म्हणतात, ‘जेणें निपजे रससोय। तो तापुही जैं जाय। तैं ते कां होय। प्रसन्न जैसी।। (तत्रैव, ओवी क्र. १८.१०९२, पृ. ८१८) आता साधनेचे श्रम संपले, हे किती सहजतेने सूचित करतात आणि जसा बोध वाढत जातो तसे ‘अज्ञान नाहीसे होत जात पूर्णबोधात ते अज्ञान संपूर्ण नाहीसे होते, हे सांगताना ते म्हणतात, ‘जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरती जाय अवधारीं। तृप्तीचां अवसरीं। नाहींच होय’।। (तत्रैव, ओवी क्र. १८.११०२, पृ. ८२०) प्रत्येक घासाबरोबर भूक भागत तृप्तीच्या वेळी नाहीशी होऊन जाते.

ज्ञानेश्वरांची शैली सुबोध व रसाळ तर आहेच पण काही वेळा ते दोन शब्दांत एक दृष्टांत, आणि एका ओवीत दोन-तीन दृष्टांत सहजपणे सांगून जातात, येथे त्यांचे अल्पाक्षरत्व दिसून येते. उदाहरणार्थ, साधक भगवंताशी एकरूप कसा असतो, हे सांगताना ते म्हणतात, ‘उदकीं कल्लोळु। कापुरीं परिमळु। रत्नीं उजाळु। अनन्यु जैसा।। किंबहुना तंतुसीं पटु। कां मृत्तिकेसी घटु। तैसा तो एकवटु। मजसी माझा।।’ (तत्रैव, ओवी क्र.१८.११८३-८४, पृ. ८२६) किंवा ‘अगा वसुधेचां पोटीं। निधान सिद्ध किरीटी। वन्हि सिद्ध काष्ठीं। वोहां दूध।।’ (तत्रैव, ओवी क्र. १८.१२२७, पृ. ८२८ )

सूर्याच्या दृष्टान्तातील त्यांची विविधता तर लक्षणीय आहे. ‘सूर्य’ हे उपमान त्यांनी विविध पद्धतीने मांडले आहे. ‘उदयजतांचि दिनकरु। प्रकाशुचि आते आंधारु’ किंवा ‘का उदयजतांचि दिवो। मध्यान्ह होय।। तसेच उदया येतां गभस्ती। नाना नक्षत्रव्यक्ती। हारवीजती दीप्ती। आंगिका जेवीं।। (तत्रैव, ओवी क्र. १८.१०९७, पृ. ८२०) किंवा ‘रवि आंधारु प्रकाशिता। नुरेचि जेवीं प्रकाश्यता’ (तत्रैव, ओवी क्र.१८.११६२, पृ. ८२४).

ब्रह्मस्वरूप झाल्यानंतर कर्म संभवत नाही, म्हणजेच भक्तीत क्रिया संभवत नाही. तरी पण चौथी भक्ती ही अद्वैतात घडणारी भक्ती आहे आणि ही फक्त अनुभवण्यासारखीच गोष्ट आहे, हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, ‘यालागीं तो क्रमयोगी। मी जालाचि मातें भोगी। तारुण्य कां तरुणांगी। जियापरी।। तरंगी सर्वांगी तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं। नाना अवकाश नभीं। लुंठतु जैसा।। (तत्रैव, ओवी क्र. १८.११४७-४८, पृ. ८२२ ).

थोडक्यात, ज्ञानेश्वरांनी क्रमयोगाचे शिखर म्हणजे ज्ञानोत्तरभक्ती, ह्या सहजस्थितीचे वर्णन करताना साधना आणि भक्तीचे तत्त्वज्ञान, दृष्टांतांच्या माध्यमातून स्पष्ट केले आहे. जणू सहाव्या अध्यायाच्या निरुपणावेळी केलेली, 'बोली अरुपाचे रूप दावीन, अतींद्रिय परि भोगवीन, इंद्रियांकरवी' (तत्रैव, ओवी क्र. ६:३६, पृ. २२८), ही प्रतिज्ञा ते पूर्ण करतात. यासाठीच जणू असंख्य उपमा-दृष्टांत आणि रूपकांनी नटलेली त्यांची भाषा अर्थाचे विविध पदर उलगडत जाते.

**संदर्भ :**


१. करंदीकर, वि. रा. (२०१३) : *ज्ञानदेवांचा गीतासंवाद*, स्नेहल प्रकाशन, पुणे.

२. गोयदन्का, जयदयाल (२०१७) : *श्रीमद्भगवद्गीता*, गीताप्रेस, गोरखपूर.

३. दांडेकर, शं. वा. आवृत्ती ११ वी (१९९८) : *सार्थ श्रीज्ञानेश्वरी*, वारकरी शिक्षण संस्था, आळंदी.

# पुस्तक परीक्षण


संशोधन

# जुगाड : शिक्षित तरुणांच्या ध्येयवादी स्वप्नांची शोकात्म कहाणी

**नंदकुमार मोरे**

प्राध्यापक, मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
nandkumarvmore@gmail.com

# संभाषित




(परीक्षित पुस्तक : जुगाड, लेखक : किरण गुरव, प्रकाशक : दर्या प्रकाशन, पुणे, प्रकाशन वर्ष : २०१८, पृष्ठे : २४७, मूल्य : रु. ३००)

कथाकार किरण गुरव यांची *जुगाड* (२०१८) ही पहिलीच कादंबरी. *जुगाड* प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांचे *राखीव सावल्यांचा खेळ, श्रीलिपी आणि बाळूच्या अवस्थांतराची डायरी* हे तीन कथासंग्रह प्रकाशित आहेत. तर *जुगाड*नंतर *क्षुधाशांती भुवन* हा त्यांचा चौथा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला. *जुगाड*ला महाराष्ट्र शासनाच्या 'ह. ना. आपटे पुरस्कारा'सह काही महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाले. अनेक वैशिष्ट्यांमुळे किरण गुरव यांची कथा मराठी साहित्यात लक्षवेधी ठरली. त्यांनी चाकोरीबद्ध कथालेखनाचा मार्ग अव्हेरून कालावकाशासह दीर्घ पल्ल्याची नवी कथा लिहिली. मराठी कथेला नवे परिमाण मिळवून देण्यात अलीकडच्या काळातील चारदोन कथाकारांमध्ये किरण गुरव यांचे नाव अग्रस्थानी आहे. बहुतांश मराठी कथा ही लघुकथाच होती. शिवाय ती साचेबद्धही होती. तिच्यात एक प्रकारचे साचलेपण आले होते. ते अलीकडच्या काही वर्षांत जयंत पवार, किरण गुरव, आसाराम लोमटे, समर खडस या कथाकारांनी घालवले. या कथाकारांनी

मराठी कथेच्या धमन्या रुंद केल्या. नव्वदीनंतर महानगरांसह गावखेड्यात नव्याने परीघावर फेकल्या गेलेल्या माणसांची कथा यांनी लिहिली. हा नवा वर्ग आज गावशहराच्या वळचणीला पराकोटीचेजीवन जगताना दिसतो. या वर्गाचा विचार जातिधर्माच्या परिप्रेक्षात करून चालत नाही. कारण अशा पद्धतीने जीवन जगणारा एक नवाच वर्ग अलीकडे उदयाला आला आहे. म्हणून या वर्गाचा विचार जातिधर्मापलीकडे करावा लागतो. तो या पद्धतीने परीघाबाहेर फेकला जाण्यात जागतिकीकरणानंतरचे आमूलाग्र बदल कारणीभूत आहेत. देशातील खूप मोठ्या वर्गाचे जागतिकीकरणानंतर रोजगार गेले, जमिनी गेल्या, घरं गेली, पारंपरिक व्यवसाय बंद पडले, शिक्षण घेऊनही बेकारी आली, अशा सामान्य माणसाचे भीषण वास्तव या कथाकारांनी समोर आणले. आशयाबरोबरच रचनाबंधाच्या दृष्टीने मराठी कथा पुढे नेली.

किरण गुरव यांनी सामान्य माणसाबरोबरच गावखेड्यातील स्त्रिया, सुशिक्षित तरुणांचे वर्तमान कथेच्या केंद्रस्थानी आणले. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी असलेली मराठी कथा तर एक घडीव साचाच बनली होती. गुरव यांनी तिचे साचलेपण दूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आशय, भाषा आणि निवेदनाच्या नावीन्यपूर्ण पद्धतीबरोबरच सूक्ष्म निरीक्षणातून तपशील भारीत करण्याची नवी हातोटी किरण गुरव यांना साध्य झाली आहे. ती त्यांच्या ‘जुगाड’ या कादंबरीतही प्रत्ययाला येते.

वर्तमान वास्तवाचा विचार करता, *जुगाड* ही समकालाची प्रातिनिधिक कहाणी आहे. शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, आत्मउन्नयनासाठी शिक्षण आवश्यक असल्याचे आलेले भान, सुशिक्षितांचा तयार झालेला मोठा वर्ग सर्वदूर दिसतो. अगदी अभियांत्रिकीसारख्या शाखेत शिक्षण घेतलेल्या तरुणांची मोठी संख्या गावखेड्यापर्यंत पाहायला मिळते. परंतु नोकरी व्यवसायाच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या प्रगतीचे मार्ग खुंटले. एक प्रकारे शिक्षणानेच या तरुणांची कुचंबणा केली. उद्योग क्षेत्रातील मंदीच्या परिणामामुळे अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेतलेले बेकार फिरू लागले. स्पर्धा वाढली. त्यातून पिळवणूक वाढली. शिक्षितांची वाढती संख्या आणि मंदी यामुळे नवे प्रश्न उभे राहिले. मंदीच्या लाटेत पिढीच्या पिढी होरपळून निघाली. त्यात भरीस भर सर्वच क्षेत्रात वशिलेबाजी, आत्मकेंद्रीतता, बाजारीकरण, राजकारण शिरले. राजकारण, शिक्षण, व्यापार-उद्योगासह सर्वच क्षेत्रात हीन प्रवृत्ती शिरल्या. त्यांनी अनेक तरुणांचे

जीवन अंध:कारमय केले. याबद्दलचे एक भीषण वास्तव *जुगाड* मुखर करू पाहते.

देशातील बहुसंख्य समाज आपल्या जीवनात उद्या काही बरे घडेल, या आशेवरच जगतो. *जुगाड*मधील शशा अशा समाजाचा प्रतिनिधी आहे. तो खेड्यातील गरीब घरात परिस्थितीशी दोन हात करीत अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला उमदा तरुण आहे. त्याचे जीवनावर, आपल्या कामावर निस्सीम प्रेम आहे. त्याला मागच्या परिस्थितीची जाण आहे. त्यामुळेच घेतलेल्या शिक्षणाच्या बळावर तो आपले जीवन घडवण्यासाठी धडपडताना दिसतो. जीवनाशी, काळाशी संघर्षरत होतो. म्हणून *जुगाड* ही शशाच्या संघर्षाची कथा आहे. लेखकाने कादंबरी दोन भागात विभागली आहे. त्यातून शहर आणि गाव असे दोन्हीकडचे वर्तमान समोर आणले आहे. पहिल्या भागात पुण्यासारख्या शहरात गावखेड्यातून गेलेले नवशिक्षित तरुण कसे झगडतात, याचे वास्तव येते. यानिमित्ताने शहरातील उद्योगव्यवसायांचे वर्तमान ही कादंबरी पुढे आणते. तर दुसऱ्या भागात ग्रामीण भागात सुरू झालेल्या उद्योगव्यवसायाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. गावाकडे बहुतांश उद्योगव्यवसाय सहकारातून सुरू झाले. अलीकडे खाजगी कारखानेही मोठ्या प्रमाणात दिसू लागले आहेत. हे उद्योग सुरू करण्यामागे उदात्त हेतू क्वचितच दिसतो. कधी स्वत:चे राजकारण चालवण्यासाठी, तर कधी स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी हे उद्योग स्थापले जातात. ते स्थापन करताना सामान्यांचा विचार जवळजवळ नसतोच. असा उद्योग स्थापन करण्यामागचा कुटील डाव ही कादंबरी उघड करते. उद्योग स्थापन करण्यामागचे बाह्यरूप आणि अंत:स्थ हेतू यामागचे वास्तव चेअरमन शेळणोलीकर चव्हाणांसारख्या इरसाल पुढाऱ्यांच्या निमित्ताने लेखक सांगू पाहतोय. चेअरमनसारख्या व्यक्तींचे स्वकेंद्री राजकारण नव्या पिढीचा, समृद्ध पर्यावरणाचा कसा नाश करते आहे, याचे वर्तमान ही कादंबरी समोर आणते. शहरात खूप धडपडूनदेखील जम न बसलेला शशा मोठ्या अपेक्षेने गावाकडे होऊ घातलेल्या नव्या कंपनीत रुजू होतो. शहराप्रमाणेच येथेही त्याच्या स्वप्नांचा कसा चुराडा होतो, हे हृदय पिळवटून टाकणारे वास्तव ही कादंबरी सांगते. त्याचा संघर्ष आणि होणारी हेटाळणी तरुणांच्या मानसिक बदलाला कशी कारणीभूत ठरते, याचे हे बोलके वास्तव आहे. जगात भारत तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. वय वर्षे तीसच्या आतील तरुणांची संख्या येथे सर्वाधिक आहे. परंतु, त्यांची

उर्जा, स्वप्ने आणि कल्पनांचा हा देश कसा खेळखंडोबा करतो, हे *जुगाड* समोर आणते.

शशासारखे तरुण कोण आहेत, या प्रश्नांचा गांभीर्यपूर्वक शोध घेतल्यानंतर कादंबरीने उपस्थित केलेले प्रश्न अधिक भयावह वाटतात. या प्रश्नांचे गहन गहिरेपण ठळक होते. शशाची चौकशी करताना सीमा तुझ्या घरी कोण कोण आहे, असा साधा प्रश्न करते. या प्रश्नाचे उत्तर देताना तो जे सांगतो, ते फार बोलके आहे. तो म्हणतो, 'एक आई आणि दुसरी चिमी. आमची म्हैस. या दोघींनी खरं तर मला विंजनेर केलं आहे. तीही आजच्या एवढी फी त्यावेळी नव्हती म्हणून.' हे उत्तर शशाची पार्श्वभूमी नेमकेपणाने सूचित करते. तो परिस्थितीने सामान्य आहे. झगडत शिक्षण पूर्ण केलेला तरुण आहे. शेतमजूरी करणाऱ्या आईच्या कष्टांवर आणि तिने पाळलेल्या म्हैशीच्या दुधातून मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशांवर त्याने शिक्षण घेतले आहे. असे झगडत शिकल्यामुळे गावात त्याला प्रतिष्ठा आहे. ही प्रतिष्ठा त्याला स्वकष्टाने मिळाली आहे. गावखेड्यात सर्वांची आर्थिक परिस्थिती कमीजास्त शशासारखीच असते. त्यामुळे असे परिस्थितीशी झगडत, स्वत:च्या हिमतीवर शिक्षण घेतलेले तरुण गावात प्रतिष्ठित होतात. शशा त्यातील एक आहे. कारण गाव अशा तरुणांना इतरांसमोर आदर्श म्हणून उभे करते. कादंबरीचा निवेदक म्हणतो तसे, 'शशाच्या एवढ्याशा गावात त्याची इज्जत फार आहे. शाळेत बिळेत तो अगदी स्कॉलर होता. त्यात मेरीटवर इंजिनिअरिंगला गेलेला. त्यामुळं गावात जाईल तिथं शशाचं आगत स्वागत.' हे आगतस्वागत त्याच्यापेक्षा त्याने कर्तृत्वाने मिळवलेल्या शिक्षणाचे होते. अशा कर्तृत्वाने मिळवलेल्या शिक्षणाची येथील व्यवस्था काय किंमत करते, हेही कादंबरी पटलावर आणते.

सामान्य कुटुंबात जन्म, परिस्थितीशी दोन हात करत घेतलेले शिक्षण, आई आणि गावातील लोकांच्या अपेक्षा या साऱ्याचा शशावर भयंकर दाब आहे. जीवनाकडून त्याच्या फार मोठ्या अपेक्षा नाहीत. परंतु आपण एका आवर्तातून बाहेर यावे, आपले दारिद्र्य संपावे, आपल्यालाही बरे जगता यावे, हीच त्याची माफक अपेक्षा आहे. त्यासाठी मिळवलेली नोकरी टिकावी, आपण कुठेतरी पर्मनंट व्हावे, असे त्याला वाटते. त्यामुळे पत्करलेली नोकरी टिकेल की नाही, नोकरी करीत असलेल्या कंपनीचे भवितव्य काय, असे अनेक प्रश्न त्याला बैचेन करीत राहतात. राधामाईचे काम अनेक दिवस ठप्प राहते. काम केलेल्या दिवसांचा मागूनही पगार मिळत नाही. तेथील परप्रांतीय

कामगार साईट सोडून नव्या कामाच्या शोधात बाहेर पडतात. हे सारे पाहून आलेली उदासी घालवण्यासाठी शशा गावी जातो. घरी गेल्यावर तो आईची नजर टाळतो. कारण गावशिवारात, शेताभातात आईने कमावलेल्या अनुभवामुळे ती शशाच्या मनाची उलघाल हेरते. त्याची उदासी तिच्या नजरेतून सुटत नाही. म्हणूनच रात्री अंथरुणावर पाठ टेकल्यानंतर अंधाराचा आधार घेत ती त्याचं मन वाचते. त्याला म्हणते, 'तुझं काय बाबा कळंना आता. आपुन काय धनदांडगं नाही. घरदार हे असं. शेतभात हाय काय आणि नाही काय. मला आता हुईना लेका. तुझं एकदा रांकला लागलं सगळं की मी मरायला मोकळी झालो रं. तुझं अजून बाळा लय हुयाचं, जायाचं. तुझं लगीन वऱ्हाड आपलं वेळंसारी व्हावं. तुझा वेलविस्तार वाढावा. नोकरीत कुठंतरी आपला टिकून रहा. कुठंबी रहा खरं टिकून रहा...' (पृ. क्र. २२७) हे तिचं सांगणं कोलमडलेल्या शशाच्या मनाला पुन्हा उभारी देते. तो सकाळी उठून नव्या जोमाने परत साईटवर येऊन रुजू होतो. वास्तविक कादंबरीच्या शेवटाकडे शशाला आलेली उदासी, त्याच्या आईचे वरील बोल कादंबरीभर चालू असलेल्या शशाच्या धडपडीला एक परिमाण देतात.

स्वत:च्या बळावर, गरीबीला तोंड देत शिक्षण घेतलेली शशासारखी हजारो मुलं नोकरीसाठी शहरांची वाट धरतात. त्यांना शहरांकडून खूप अपेक्षा असतात. तिथे गेल्यानंतर वेगवेगळ्या कंपन्यांचे नवे जग त्यांना खुणावू लागते. आधी आलेल्या मित्रांकडून कंपन्यांतील सोयीसुविधा, तेथील कँटीन, पगार, भत्ते याबद्दल कानावर पडलेले अनुभव आणि कंपन्यांचे भारावून टाकणारे बाह्य वातावरण यामुळे त्यांच्या अभावग्रस्त जगण्याला नवी पालवी फुटते. युनिफॉर्म, कंपनीचे बूट, कँटीनमधील दूधफळांसह दिले जाणारे जेवण, तेथील चकचकीत स्वच्छता, हे सारेच या मुलांना स्वप्नवत वाटते. अभावात दिवस काढलेल्या प्रत्येकाला हे जग मोहमयी वाटते. त्यामुळेच आपण एखाद्या चांगल्या कंपनीत कायम व्हावे आणि हे सर्व आपल्याला कायमचे लाभावे, असे त्यांना होऊन जाते. त्यामुळेच ही मुलं पुण्यासारख्या शहराची वाट धरतात. तेथील कुबट वासाने लदलदलेल्या आणि डासढेकणांनी बजबजलेल्या श्री लॉजचे जगणे पत्करतात. उमेदवारीचे दिवस अशा कोंदट जागेत पुढच्या आशेवर घालवतात. गावखेड्यातल्या मोकळ्या हवेत वाढलेली ही मुलं अशा जागेत, तेथील प्रश्नांना तोंड देत, झगडत नोकरीचा शोध घेत वणवण भटकतात. शहराने केलेले अनेक अपमान पोटात घालतात.

संभाषित

वर सांगितल्याप्रमाणे कादंबरीच्या पहिल्या भागात नोकरीसाठी पुण्यात दाखल झालेल्या काऱ्या तरुणांचे भावविश्व येते. खाजगी कंपनीमधील नोकऱ्यांसाठी धडपडणाऱ्या शिक्षित काऱ्या तरुणांचे भावविश्व मराठी कादंबरीत यानिमित्ताने प्रथमच आले आहे. येथील या तरुणांचे जगणे किरण गुरव यांनी स्वत:च्या विलक्षण निवेदनशैलीत सांगितले आहे. त्यांच्या निवेदनाच्या भाषेला असलेली मिश्किल किनार वाचकांच्या गालावर स्मित आणते. वास्तविक त्यांच्या मिश्किल शैलीत कमालीचा उपरोध दडलेला असतो. तो हेरला तर मात्र वाचक गंभीर होत जातो. कष्टाने, ध्यासपूर्वक शिक्षण घेणाऱ्या तरुणांच्या वाट्याला काय येते, हे उमजू लागते. त्याच्या उमेदीच्या दिवसांना येणारी अवकळा अधिक ठसठशीत वाटू लागते. संवेदनशील वाचकाला अंतर्मुख करते. श्री लॉजसारख्या ठिकाणी राहणे, हे केवळ नाइलाजाचे जगणे असते आणि ते अनेकांना जगावे लागते. म्हणूनच 'बहिरी ससाण्याची नजर' असलेला लॉज मालक शितोळे येथील मेंबरांशी उद्धट बोलतो. येथील गैरसोयींकडे मुलांनी दुर्लक्ष करावे, यासाठी तो आपल्याकडे मोठी वेटिंग लिस्ट असल्याचे वारंवार सांगतो. ही वेटिंग लिस्ट शशासारख्या तरुणांचीच आहे, हे या शहराचे उघड सत्य आहे. ही लिस्ट आणि येथे राहणारे सारे तरुण खत्रूड मालकासह येथील गलिच्छता, डासढेकणांसोबतचे कोंदट जगणे का स्वीकारताहेत? याचे उत्तर ही कादंबरी देते. या मुलांना अशा शहरात चांगले पोटभर जेवण देणारी मेसही मिळणे मुश्किल असते. म्हणूनच पुषप्याच्या मनाशी जिद्द होती की, 'या शहरात एक ना एक दिवस रुचकर आणि पोटभर जेवण देणारी मेस हुडकीनंच हुडकीन.' तर या तरुणांची पार्श्वभूमी पाहता, अशा शहरात राहणे ही अपरिहार्यता असते. त्यांना शहरात स्वत:चा आसरा असण्याची शक्यता जवळजवळ नसते. त्यामुळे मागची परिस्थिती त्यांना हे जगणे स्वीकारायला भाग पाडते. हे दिवस बदलतील, या आशेवर हे तरुण हे जगणं स्वीकारतात आणि दिवस अक्षरश: धकवतात.

येथे चार गावचे चार तरुण एकत्र आल्यानंतर स्वाभाविक जगण्याचा भाग म्हणून ते थोडी मौजमस्तीही करू पाहतात. आनंदाच्या काही वाटा शोधू पाहतात. परंतु, त्यांचा आनंद दीर्घकाळ टिकत नाही. शहरातील अनिवार्य संघर्ष त्यांचा उत्साह घालवून टाकतो. नोकरीत कुठेतरी कायम होण्याच्या कुतरओढीने त्यांची मने काळवंडून जातात. आपण कधी आणि कसे कायम होऊ, आपल्या स्पर्धकांवर मात करीत एखादी चांगली कंपनी कशी मिळवू,

हेच त्यांच्यासमोरचे प्रश्न आहेत. यात केवळ टिकून राहण्याची आस आहे. येथील कंपन्या व्यवहारी हेतूने तरुणांचा पुरेपूर वापर करून घेतात. कायम करण्याच्या आशेवर ठेवून त्यांच्याकडून पुरेपूर काम करून घेतात. गरजू आणि होतकरू मुलांचा वापर करून घेता यावा, यासाठी 'टेंपररी' भरत्या सुरू ठेवतात. 'टेंपररी' मुलं शिकाऊ म्हणून पडेल ते काम करतात. गावाकडून आलेली शशासारखी सगळी मुलं पुढे कायम होऊ, या आशेने शिकाऊ कामगार म्हणून भरती होतात. कंपन्यांसाठी राबराब राबतात. वरिष्ठांची मर्जी सांभाळत 'पर्मनंट' होण्याच्या स्वप्नाखातर डब्बलटिब्बल पाळया करतात. हंगामी पोरांपुढे या काळात काम हाच देव असतो. कंपन्याही त्यांना कामाचा प्रचंड दाब देतात. हा दाब व्यक्त करताना लेखक लिहितो, 'प्रॉडक्शनचा देव त्याला रिजेक्शनचा भेव. क्वालिटीचा देव त्याला पासिंगचा भेव. मेंटनन्सचा देव त्याला ब्रेकडाऊनचा भेव.' हा 'भेव' या मुलांची पुरती दमछाक करतो. कंपन्यांमधील पर्मनंट झालेले लोक या मुलांची कंपनीच्या मालकापेक्षा जास्त पिळवणूक करतात. कंपनीत येताजाता कंपनीच्या बसमध्येही हंगामीने उभे राहायचे आणि पर्मनंट कामगाराने बसायचे, असा अलिखित नियम झालेला आहे. त्यामुळे या मुलांना पर्मनंट होणे, हेच जीवनाचे भागध्येय वाटते. येथील वाट्टेल ते कष्ट उपसण्यामागे त्यांचे हेच ध्येय असते.

त्यांच्या पर्मनंट होण्याच्या आशेला नुसती पालवी फुटू देऊन बऱ्याचवेळा कंपनी कामावरून कमी करते. जुन्या तरुणांना काढून नव्या तरुणांना घेते. खरे तर हे कंपन्यांनी आरंभलेले दुष्टचक्र आहे. अशा चक्रात अडकलेला शशा पुण्यात नोकरीसाठी झगडताना मंदीची लाट येते. त्याची हातची नोकरी जाते. तो बेकार होतो. अगदी साध्या वर्कशॉपमध्येही त्याला नोकरीची संधी मिळणे मुश्किल होते. नोकरीच्या जाहिराती बघणे, नोकरी मिळवून देणाऱ्या एजन्सींकडून नवनवे कॉल मिळवणे, ते पाठवतील तेथे मुलाखतीला जाणे, अशा उद्योगाला तो लागतो. अशाच एका मुलाखतीसाठी तो सासवडच्या नव्या एमआयडीसीत जातो. वास्तविक ती कंपनी म्हणजे छोटा वर्कशॉप असते. येथे नोकरी शोधायला आलेला शशा अस्मानी सुल्तानी संकटात ढकलला जातो. येथील प्रसंगानंतर त्याची जगण्याची सगळी आशाच संपते. दोनतीन दिवस तापाने फणफणत बेशुद्धावस्थेत तो लॉजच्या खोलीत पडून राहतो. हे त्याचे पडून राहणे बेकारीचे भीषणत्व प्रतिध्वनीत करते.

उद्योगविश्वात दोन लाटा येत-जात असतात. तेजीची आणि मंदीची. मंदीच्या लाटेत शशासारखे शेकडोजण होरपळून जातात. तर तेजीच्या दिवसात कामगारांना दिवसाचे चोवीस तास कमी पडतात. अशा दिवसात एखाद्या कामगाराचे स्वत:चे लग्न असले तरी, आपण त्या लग्नात हजर असू की नाही, याबद्दल शाश्वती देता येत नाही. या दिवसात रजेवर सोडाच लघवी, संडासलाही सोडण्याची मारामार. त्यामुळे येथील प्रत्येक दिवस वेगळा. येथेही माणसांच्या विविध प्रवृत्ती कार्यरत. ज्याचे लग्न उद्या आहे, त्याला आज संध्याकाळपर्यंत रजा मंजूर न करणारे पांडवसारखे विकृत लोकही कंपनीचे वास्तव असते. कादंबरीत निवेदकाला अशा रजा नाकारलेल्या नवरदेवाचे लग्न कंपनीतच उरकून उघड्या चासिसमधून वधूवरांची वरात काढायची कल्पना सुचते. इतकेच नाही, रजा नाकारणाऱ्या पांडव साहेबाला वरातीत चासिसपुढे डान्स करायला लावावा असे वाटते. हे वाटणे येथे होणाऱ्या पिळवणुकीबद्दलचा उद्वेग आहे. येथील टेंपररी मुलांची तेजीत पिळवणूक आणि मंदीत ससेहोलपट अशी परिस्थिती आहे. शशाची टेंपररी नोकरी जाण्याअगोदर निवेदक म्हणतो तसे, 'मंदीच्या वार्ता सगळ्या शहरभर दुर्गंधीसारख्या झटकन पसरल्याने टेंपररी लोकांनी बुजबुजलेली हॉटेलं आणि लॉज, मेस किंवा खानावळी यावर एक मलूल हवा आपसूक पडली.' यावेळी साहेब लोकांची चाटुगिरी करणारा माळवीसारखा टेंपररीही हवालदिल होतो. कारण पर्मनंट करतील अशी अपेक्षा ठेवलेल्या साहेबांकडून त्याला निरोपाचा नारळ आणि मंदी उठताच पुन्हा बोलावण्याचं केवळ आश्वासन मिळते. तो मग विमनस्कपणे आपल्या करियरलाच कुणाचीतरी नजर लागली म्हणत माथेफिरूसारखा फिरू लागतो. या मुलांना रोजचे वर्तमानपत्रही जाहिरातींसाठीच वाचायचे असते. त्यामुळे 'आज काही पेपरला नोकरीविषयक जाहिराती नसतात. त्यामुळे त्यात इंटरेस्ट घेऊन वाचण्यासारखं काही दिसत नाही.' असे पुषप्याचे म्हणणे बोलके आहे.

संघर्षाचे भयंकर दिवस सहन करणारा आणि सासवडमधील कंपनीच्या मुलाखतीच्या अनुभवानंतर शशा नव्याने होऊ घातलेल्या राधामाई बॉक्साइट कॅल्सिनेशन फॅक्टरीत इंजिनिअर होण्यासाठी गावी परततो. शशाच्या निमित्ताने पुण्यातील कंपनीविश्व, तेथील तरुणांचा नोकरी मिळविण्यासाठीचा जीवघेणा संघर्ष, मालकांची मानसिकता, या तरुणांचा वापर करून घेणारी संवेदनाहीन व्यवस्था सारेच चिंतनप्रवृत्त करणारे आहे. येथील संघर्षातून हाती काही न लागलेला शशा आपले भविष्य घडवायला गावी येतो. परंतु

तेथील अनुभवही पुण्यापेक्षा वेगळा नसतो. राधामाईचे चेअरमन कोणत्याही उदात्त हेतूसाठी ही कंपनी उभे करीत नसतात. त्यांना सीमा, शशासारख्या आपल्याच गावातील मुलांच्या भविष्य आणि जीवनाबद्दल काही पडलेले नसते. या साईटवर काम करणाऱ्या हॉलमार्कसारख्या कंपनीचे कर्मचारी, त्यांची ही कंपनी उभी करून उत्पादन सुरू करून देण्याची जिद्द याच्याशीही त्यांचे काही देणेघेणे नाही. वरून रांगडा, गावपातळीवरचा पुढारी असे रूप असलेला चेअरमन अंतस्थ मोठा चतूर आहे. त्याचा हेतू कंपनी उभी करून जनकल्याण करावे, हा नसून त्याची धडपड फुकटचे मौल्यवान बॉक्साईट लुटून गडगंज होण्यासाठी चालली आहे.

शशी साईटवरचे सुस्तावलेले काम आणि रखडलेला आपला पगार मागण्यासाठी चेअरमनच्या घरी जातो. यावेळी चेअरमन त्याचा अपमान करतो. यावेळी चेअरमन नशेत बोलतो ते ऐकून शशाच्या स्वप्नांची माती होते. तो दारूच्या नशेत आपला हेतू उघड करतो. म्हणतो, 'खरं तर खाणीसाठी ह्या प्लँट टाकला. कारखाना बघून तरी खाणीला परवानगी देऊ दे सरकार म्हणून. नाहीतर ह्या प्लँटात काय हाय, व्हय काय हाय? व्हूं म्हणून पैसा आधी वतायचा आणि मागनं त्या आडव्या नळयातनं कुथून कुथून भाईर काढायचा. ह्यो काय धंदा हाय? धंदा मर्दा खाणीत हाय. भूपाळवाडीचा सगळा डोंगर आपल्या मालकीचा झालाय. सँपल सर्वे झालाय. आजूबाजूच्या डोंगरासारखं तिथंबी बॉक्साईट मावंना. नुसता डोंगर उकरायचा. ट्रकात घालायचा नी लांब नेऊन विकायचा. मातीचा पैसा' (पृ. क्र. २१७). हे कंपनीचे खरे वास्तव ऐकून तो हवालदिल होतो. म्हणजे शशाची येथेही घोर निराशा होते. निराशाच नाही, फसवणूक होते. मोठ्या कष्टाने घेतलेले शिक्षण आणि पाहिलेली स्वप्ने धुळीला मिळत असलेली पाहून शशा मानसिकदृष्ट्या खचतो.

शशाची कामावरची निष्ठा, तळमळ राधामाईच्या उभारणीच्या प्रक्रियेत प्रत्ययाला येते. शशाने आपले भवितव्य पणाला लावलेल्या या साईटवर त्याच्यासह अनेक परप्रांतीय कामगार, हॉलमार्कचा स्टाफ सर्वच निराश झाले आहेत. हे सर्व कंपनीच्या भविष्याबद्दल साशंक आहेत. येथे हाताला फारसे काम राहिले नसल्याच्या चिंतेत आहेत. त्यामुळे शशा सोडून सर्वजण बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत. अशा स्थितीत टेंपररी नोकरीला वैतागलेला श्री लॉजवरील शशाचा सहकारी मित्र गोप्या साईटवर येतो. वास्तविक तो रुरल इंजिनिअरिंग कॉलेजच्या लॅब असिस्टंटच्या जागेसाठी

मुलाखत द्यायला आलेला असतो. मुलाखतीतली वशिलेबाजी, मुलाखत देणाऱ्यांची महापूर गर्दी, त्यामुळे आलेले जत्रेचे स्वरूप बघून तो येथील आपले भवितव्य ओळखतो. किमान आलोच आहे, तर शशाच्या कंपनीत काही लहानमोठी नोकरी मिळते का, हे पाहायला वाट वाकडी करतो. अचानक शशाच्या साईटवर धडकतो. तेथील ठप्प पडलेली कंपनी बघून, ‘हे आसं नामवालं पर्मनंट राहण्यापेक्षा तिकडं पुण्यात टेंपररी राहणं काय वाईट हाय बे?’ असे शशाला म्हणतो. एवढेच नाही, ‘आम्हाला वाटलं लय भारी आसंन बे तुझं सगळं हिकडं.’ असेच आम्हाला वाटत असल्याचे शशाला सांगून टाकतो. शशाही त्याच्यापासून काही लपवत नाही. त्याला प्लँट दाखवताना, ‘मी या प्लँटचा इंजिनिअर कमी आणि टुरिस्ट गाईड जास्त झालोय आजकाल.’ असे कंपनीतले आपले वास्तव कथन करतो. कारण सध्या तो चेअरमनच्या पैपाहुण्यांना प्लँट दाखवण्याचे आणि इकडेतिकडे पडलेली मशिनरी राखायचे एकमेव काम करतो.

राधामाईचा सर्व कारभार शशाला निराशेच्या खाईत लोटणाराच आहे. कंपनीचे काम पूर्णत: बंद पडले आहे. येथील परप्रांतीय कामगार गावी जात आहेत. ते येथील कायम कर्मचारी नसूनदेखील कंपनी बंद पडत असल्याचे पाहून मनापासून दु:खी होतात. तेही आपण पहिले उत्पादन काढून देऊ शकत नसल्याचे शल्य शशाजवळ बोलून दाखवतात. अशाही स्थितीत शशा साईटवर भकास दिवस काढत बसलेला असतो. अशात चेअरमन मुंबईहून गेस्ट हाऊससाठी चांगले नळ, शॉवर आणतात. त्याचे सत्तर हजाराचे बिल शशाला नोंदवून घ्यायला लावतात. हे सामान बघून, ‘कशाला आणलंय हो हे? प्लँट वर पडलाय अर्धवट त्याचं कुणाला काय नाही. हे गेस्ट हाऊस सजवण्याची एवढी घाई का? कशाला पैसा घालवायचा ह्या फालतू कारणासाठी?’ असा प्रश्न तो करतो. या प्रश्नावर तेथील डेप्युटी ‘तुमी आमी हुकमाचं ताबेदार. साहेबानी धू म्हटलं की धुवायचं. बाकीची लांबट कशाला?’ असा प्रतिप्रश्न उपस्थित करतो. तेव्हा शशाला येथील भवितव्याचे सूचन होते.

पुण्यातील टेंपररी नोकऱ्यांना वैतागलेला आणि तेथे बस्तान बसेल, याची आशा सोडून दिलेला शशा मोठ्या अपेक्षेने गावाकडच्या या कंपनीत रुजू आलेला असतो. तर येथेही त्याच्या पदरी निराशाच येते. साईटवर त्याच्या अगोदरपासून काम करणाऱ्या सीमा या सिव्हिल इंजिनिअर मुलीशी येथे येऊन तो थोडा संवादी होतो. त्याला तिच्या सहवासात काहीएक

आनंद वाटू लागतो. दोघेही एकमेकांच्या जवळ येतात. परंतु यांचे जवळ येणे सीमाच्या वडिलांना जाचते. शशा इंजिनिअर असूनही सीमाचे वडील या संबंधांना विरोध करतात. सीमाला नोकरीवर पाठवायचे बंद करतात. लांब तिच्या बहिणीकडे पाठवून पीडब्ल्यूडीत इंजिनिअर असलेल्या व्यक्तीबरोबर तिचे लग्न ठरवून टाकतात. असे एक एक आघात शशावर होतात. तो सीमाच्या जातीचा असूनही त्याच्या अशा नोकरीमुळेच तिचा बाप संबंधांना विरोध करतो. हे त्याला कळून चुकते. जीवनाची सर्व गणिते अशी नोकरीजवळ येऊन थांबत असल्याने शशा हैराण होतो. तो झोपेत, 'तुमच्या सगळयांच्या आयला लावतो गाढव..' असे बडबडत उठतो. काही वेळाने भानावर येतो. भानावर आलेल्या शशाला, 'आपल्या नोकरीचं काही खरं नाही. आपल्या नोकरीचं काही खरं नाही..निम्म्या वयाचे होत आलो तरी आपल्या नोकरीचा जुगाड कुठं होत नाही. आपला जुगाड कुठं होत नाही. कुठं शोधावी नवीन नोकरी आता? शहरात? खेड्यात? पदविकेचं झापड आपण स्वत:हून डोळयाला लावून घेतलं आणि त्या पलीकडच्या दुनियेला पारखे झालो' (पृ. क्र. २२१). असे विचार मनात यायला लागतात. स्वत:पुरत्या का असेना, परंतु असोशीने तो या साईटला भिडला होता. येथील काम, कामगार त्यांची असोशी याबद्दल शशा अंतर्मुख होऊन विचार करू लागतो. या सर्व विचारातून आता आपल्या नोकरीचं काही खरं दिसत नाही, हे शशाला कळून चुकते. तो वैफल्यग्रस्त होतो.

शशा असा भवितव्याच्या तंद्रीत मनोमन प्लँटला श्रद्धांजली वाहतो. आत भूकंप व्हावा तशी त्याच्या मनात प्रचंड उलथापालथ होते. वैफल्यग्रस्त होऊन काही कळायच्या आत तो प्लँटवरून उडी मारतो. या उडीत त्याचा जीव जात नाही. परंतु, तो पाय अधू करून घेतो. जखमी पाय ओढत अवेळी गावी जायला निघतो. 'मग आता पुढं जाऊन तरी काय उपयोग? काय पुढं गावणार नाही म्हणताय. ज्या प्रवासाचं, नात्यांचं, स्थळाचं पुढं जाऊन काही होणार नाही, त्यांचा उपयोग तरी काय?' असे असंबंध भ्रमिष्टासारखे बडबडत गावी जाणारी शेवटची गाडी असतानाही एका पुलावर अचानक एस. टी. थांबवायला लावतो. पुलावरून उडी टाकण्याचा विचार करत असताना एसटीतला कडंक्टर त्याला दोन खडे बोल सुनावतो. त्याला म्हणतो, 'तुमच्यासारख्या शिकलेल्या माणसांचं एक असतयं. तुमचं जे काय असतंय, तेचा सगळा उपयोग, सगळा फायदा तुमाला सोताला पायजे असतोय. अहो एकांडावती मी म्हणतो तुमाला जरी नाही उपयोग झाला,

तरी दुसऱ्या कुणाला तरी हुईल. घरादाराला हुईल आणि कुणाला तरी हुईल. ते तुमचं काय नसतंय. नुसतं मी आणि माझं..बसा बघू गप खाली.' असे म्हटल्यावर शशा किंचित शरमतो. तो अंतर्मुख होऊन नवा विचार करतो. 'शरीर धड तर सगळं धड. बाकी सगळं ठीक करण्याचाही निदान तुझ्यापुरता तरी तोच एकमेव जुगाड आहे. शरीर हाच तुझ्या असण्याचा आणि अक्षरश: नसण्याचाही एकमेव, अंतिम आणि अपरिहार्य जुगाड आहे, तेव्हा टिकून रहा.' असे स्वत:ला बजावतो आणि सावरतो. आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होतो.

अशा पद्धतीने *जुगाड* शशाच्या रूपाने शिक्षित तरुणांच्या वैफल्यग्रस्त होण्याची कथा सांगते. ही कादंबरी अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन एका चक्रव्यूहात फसलेल्या तरुणाचे वर्तमान वास्तव आहे. अशाही परिस्थितीत टिकून राहण्याचा संघर्ष आहे. *जुगाड*ची चर्चा अनेक अंगाने करता येईल. कादंबरीचे बलस्थान असलेली भाषा, निवेदनशैली याबद्दलही विस्ताराने चर्चा करता येईल. कारण किरण गुरव हे भाषेवर हुकूमत असलेले आजचे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांना भाषा वश झाली आहे. कोल्हापूर-गारगोटी परिसरातील भाषेचा सर्जक वापर करत ते आपले निवेदन समृद्ध करतात. खेडूतांच्या बोलण्यात असलेली सहज मिश्किल शैली ते कौशल्याने उपयोजतात. बोलीतले शब्द चपखलपणे वापरण्याची सिद्धी त्यांना प्राप्त झाली आहे. इतकेच नाही स्वत:च्या शैलीगत अर्थासाठी बरेच शब्द ते नव्याने घडवताना दिसतात. यासंदर्भात कादंबरीत त्यांनी वापरलेले लॉजगुण, परलग्नप्रवेशसारखे शब्द पाहता येतील. शिवाय बोलीतील उत्तमोत्तम प्रतिमा, प्रतीके ते कौशल्यपूर्वक वापरतात. एखाद्याच्या वर्तनाबद्दल 'बहिरी ससाण्यासारखी नजर'सारखी प्रतिमा वापरल्यानंतर फार बोलावे लागत नाही. कंपनीतल्या सहा महिन्याच्या टेंपररी नोकरीचे वर्तमान 'पदरी पडलं आणि सहा महिने पवित्र झालं.' यासारख्या वाक्यात ते सांगून जातात. 'सुवासिनीनं कुकवाला आणि शशासारख्यानं बायोडाटाला कधीही नाही म्हणू नये.' हे सुशिक्षित बेकाराची दयनीय स्थिती सांगणारे वाक्य त्यांनाच सुचू शकते. आपल्या निवेदनात ते मिश्किलीने अनेक वाक्यं पेरतात. 'आपल्या ब्रशवर शशाची टूथपेस्ट ह्या कडंस्न त्या कडेपर्यंत दोस्ती खात्यात पिळून घेतली.', 'संडासात टाईम्स वाचून आपलं इंग्रजी बसल्या बैठकीला पक्कं केलं पाहिजे.', 'आता सासवडही झालं की या शहराचा दिग्विजय तरी पूर्ण होईल.', कोल्हापुरातल्या दोन्ही एमआयडीसी आणि

उद्यमनगर तीन-चार वर्ष आळीपाळीनं धोपटून घेतलं.', 'मिस्त्रीयुगाचा अंत', 'मुलाखतीला नि:शब्द श्रद्धांजली दिली', 'बिनकामाच्या सुस्तीचा वेढा हळूहळू साईटभोवती वाढू लागला.', 'सगळा प्लँट चित्रासारखा ठप्प.' ही त्यांच्या निवेदनातील काही निवडक वाक्यं. ही वाक्ये किरण गुरव यांच्या भाषावापराची शैली म्हणून अभ्यासता येतील. या वाक्यांची रचना खास गुरव यांची आहे. या शैलीव्यतिरिक्त सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण करून तपशील भरण्याची त्यांची स्वत:ची एक पद्धत आहे. ज्यातून माणसांचे, काळाचे सूक्ष्म पदर उलगडत जातात. प्रस्तुत कादंबरीत या सर्वांबरोबरच खाजगी कंपन्यांची कार्यपद्धती, तेथील यंत्रसंस्कृती आणि त्यासंबंधित भाषेचे सूक्ष्म तपशील येतात. शिवाय उद्योगभाषेसह परप्रांतीयांची बोली त्यांनी बारकाव्यानिशी वापरली आहे. निरीक्षणाच्या बळावर हिंदी भाषिक कामगारांच्या भाषेचा चपखल वापर, हा या कादंबरीच्या भाषेचा एक विशेष आहे. त्यामुळे ही कादंबरी केवळ सरळसोट कथानक वाटत नाही. अशा वैविध्यपूर्ण भाषावापरामुळे, प्रतिमा, प्रतीकांच्या भाषेमुळे आणि उपरोधिक शैलीमुळे कादंबरीची परिणामकारकता अनेक पटीने वाढली आहे.

एकूणच ही कादंबरी वर्तमान परिस्थितीशी झगडणाऱ्या तरुणांची शोकात्म कथा आहे. शशासारख्या कामावर निष्ठा असलेल्या, तळमळीने कंपनीसाठी काही करू पाहणाऱ्या तरुणाची शोकांतिका आहे. लेखकाने अतिशय कल्पकतेने या कादंबरीत दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात शहरी भांडवलदारी व्यवस्थेचे रूप उघडे पाडले आहे. तेथील अर्थव्यवस्थेवर मक्तेदारी असलेल्या खाजगी कंपन्यांशी तरुणांचे झगडणे या भागात येते. तर दुसऱ्या भागात गावखेड्यात हीन प्रवृत्तीचे नेतृत्वही तरुणांच्या जीवनाशी कसे खेळते, याचे वर्तमान येते. शहराने नाकारलेले तरुण आपल्याच गावात फसवले जातात, हे भयाण वास्तव येथे येते. गावे बदलली म्हणजे नेमके काय बदललेय, हेच यानिमित्ताने पटलावर येते. गावाला आधार वाटत असलेल्या नेतृत्वातच झालेला मूल्यऱ्हास यानिमित्ताने अनुभवता येतो. नैसर्गिक साधनसंपत्तीवर डोळा ठेवून चाललेल्या ग्रामविकासाचे खरे रूप ही कादंबरी उघड करते. स्वत: मातब्बर आणि देश उजाड करत चाललेल्या सत्ताधाऱ्यांचे खरे रूप ती समोर आणते. ग्रामीण भागाच्या विकासाचे नाटक करणाऱ्या रांगड्या चेअरमनला आपण किती निष्पाप जीवांशी आणि पर्यावरणाशी खेळतोय, याचे जराही भान नाही. म्हणूनच ही संवेदनाहीन काळाची कहाणी आहे. देशात बहुसंख्य असलेल्या तरुणांचे आज भविष्य


काय, हा प्रश्न ती उपस्थित करते. जो देश आपल्या तरुणांच्या स्वप्नांची थट्टा करतो आणि त्यांना त्यांच्या प्राक्तनावर सोडून देतो, त्या देशाचे भवितव्य उघड आहे. राजकारणी लोकांचे डावपेच, शहरातील कंपन्यांची ध्येयधोरणे, त्यांची दडपशाही आणि त्यांचा आत्मकेंद्री दृष्टिकोन अशा तरुणांची पुरती वाट लावतो. या सर्वांबद्दलचे एक भीषण वास्तव म्हणून *जुगाड* ही कादंबरी महत्त्वाची वाटते. हा काळ अशा संवेदनाहीन लोकांकडून सामान्यांची फसवणूक करणारा आहे. यासाठीच *जुगाड* आजच्या काळाचे कथन आहे.

संशोधक

# बिजापूर डायरी : समाजकार्याचा प्रेरणादायी प्रवास

**रविकांत शिंदे**

साहाय्यक प्राध्यापक
मराठी विभाग
श्री. शिवाजी महाविद्यालय,
बार्शी, सोलापूर
rvkntshinde@gmail.com




(परीक्षित पुस्तक : बिजापूर डायरी [छत्तीसगढमधील अनुभव एका स्त्रीरोगतज्ज्ञाच्या नजरेतून], लेखक : डॉ. ऐश्वर्या रेवडकर, प्रकाशक : साधना प्रकाशन, पुणे, प्रकाशन वर्ष : १ जानेवारी २०१९ पृष्ठे : १८३, मूल्य : रु. २००)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने २०१९ सालासाठी ‘ललितगद्य’ या साहित्यप्रकारास दिला जाणारा ‘ताराबाई शिंदे पुरस्कार’ डॉ. ऐश्वर्या रेवडकरलिखित *बिजापूर डायरी* या पुस्तकास मिळाला आहे. छत्तीसगढमधील दुर्गम आणि आदिवासीबहुल बिजापूर जिल्ह्यातील सरकारी दवाखान्यात सन २०१७ पासून लेखिका ह्या स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. तिथल्या वास्तव्यादरम्यान आदिवासी स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्यांचे निवारण करीत असताना, स्थानिक लोकांशी संवाद साधत विविध सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी जाण्याचा यशस्वी प्रयत्न लेखिकेने केला आहे. समाजातील वंचित घटकांविषयी आजोबांपासून मिळालेल्या सक्षम वारशाला अधिक व्यापक करताना रंजल्या, गांजलेल्यांच्या दु:खावर फुंकर घालण्याचे मनोभावे प्रयत्न त्यांनी केलेले आहेत. लेखिका जरी स्त्रीरोगतज्ज्ञ असल्या तरी, सामाजिक बांधिलकीचे व्यापक आत्मभान जोपासत आपले उत्तरदायित्व समजून

त्याप्रमाणे कार्य करतानाच, आपल्यासारखेच समान ध्येय बाळगून या भागात कार्यरत असणाऱ्या त्यागी, नि:स्पृह व्यक्तिमत्त्वांचा परिचयही लेखिकेने या पुस्तकात करून दिलेला आहे. आरोग्याच्या मुद्द्यापासून सुरू होणारा या पुस्तकाचा प्रवास व्यापक प्रेरक सामाजिक कार्याचा उत्कृष्ट पॅनोरमा आपल्या डोळ्यांसमोर उभा करीत जातो.

छत्तीसगढमध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून काम करत असताना आलेल्या अनुभवांच्या नोंदींचे हे साक्षेपी संकलन आहे. साधना साप्ताहिकातून यापूर्वी प्रकाशित झालेल्या आणि इतर अशा एकूण पंचवीस लेखांच्या या पुस्तकातून आरोग्य, शिक्षण, संस्कृती, स्त्रियांचे कमालीचे सोशिक जग याबरोबरच नक्षलवाद, प्रशासन, राजकारण आणि भोवतालचा निसर्ग यांच्याविषयीच्या सखोल नोंदी आलेल्या आहेत.

नऊ महिन्यांची गर्भवती असणारी ‘बेच्चो’ ही आदिवासी स्त्री कळा घेत असताना शेकोटीसाठी लावलेल्या आगीवर कोसळते. कमरेपासून पायापर्यंत ४५% भाजलेल्या अवस्थेत आणि पोटात मृत बाळ घेऊन ती बिजापूरच्या सरकारी रुग्णालयातील स्त्रीरोगतज्ज्ञापुढे मदतीच्या अपेक्षेने उभी राहते. अथक परिश्रमानंतर तिचा जीव वाचविण्यात डॉक्टरांना यश येते. एखाद्या चित्रपटात शोभावा, असा हा प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर साक्षात उभा राहतो. डॉक्टर आणि रुग्ण यांच्या नात्याची घट्ट वीण आपण डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांच्या *बिजापूर डायरी* या पुस्तकामध्ये अनुभवतो.

बिजापूरमधील आरोग्य व्यवस्थेचा एक भाग म्हणून कार्य करीत असताना, आपल्या कामाच्या पलीकडे जाऊन डॉ. ऐश्वर्या यांनी या पुस्तकात सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांची चिकित्साही केलेली दिसून येते. नियमितपणे रुग्णतपासणीचे काम करताना त्यांच्या आरोग्यविषयक अनास्थांच्या कारणांचा शोधही त्यांनी यानिमित्ताने घेतला आहे. कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी घाबरणारी आणि त्यातून दहा-दहा बाळंतपणाला सामोरे जाणारी सुकली, दवाखान्यात न येता घरीच दाईच्या मदतीने प्रसूती करून घेताना गर्भाशय पोटातच फुटल्याने आपले मूल गमावणारी राणी यासारख्या कितीतरी स्त्रिया आपणास इथे भेटतात. अशिक्षितपणा, अंधश्रद्धा यांनी वेढलेल्या या समाजात आरोग्याविषयक आत्मभान जागृत करण्याचे प्रामाणिक प्रयत्न डॉ. ऐश्वर्या यांच्याकडून होताना दिसतात. रुग्णांच्या गंभीर समस्यांनी अस्वस्थ होणाऱ्या आणि त्या समस्यांना सोडविण्यासाठी धडपडणाऱ्या स्त्रीरोगतज्ज्ञाची ही डायरी

त्या प्रदेशाच्या आरोग्यविषयक समस्यांची गंभीर चिकित्सा यानिमित्ताने आपणांसमोर मांडते.

रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांच्या अनारोग्यापाठीमागे वेगवेगळे सामाजिक प्रश्नही दडलेले असतात. आदिवासी भागात तर हे प्रश्न अधिक गंभीर असतात. गंभीर आजारी असल्याशिवाय रुग्णालयापर्यंत जाण्यासाठी टाळाटाळ करणे, दळणवळणाची साधने नसणे, पावसाळ्यात नद्या ओलांडता न येणे, नक्षलवादी लोकांनी निर्बंधित केलेल्या गावातून बाहेर पडता न येणे, या आणि अशा अनेक कारणांनी रुग्ण दवाखान्यापर्यंत पोहोचतच नाहीत. त्यातही ती जर स्त्री असेल तर तिच्या समस्यांकडे कुणाला बघायला वेळही नसतो. त्यातूनच पाच वर्षांपासून आपले गर्भाशय बाहेर लोंबत असूनही दवाखान्यात जाण्याचे टाळणाऱ्या गंगालूर गावातील स्त्रीचा विदारक अनुभव लेखिका आपल्यासमोर मांडते, तेव्हा आपणही त्या अनुभवाने शहारून जातो. स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांची गंभीर मांडणी या पुस्तकातील बऱ्याच लेखांतून आपणास वाचायला मिळते.

रक्ताची कमतरता हा आदिवासी भागातील स्त्रियांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे. एक-दीड ग्रॅमपर्यंत खालावलेली रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी ही इथली नित्याची बाब आहे. स्त्रियांच्या प्रसूतीदरम्यान होणाऱ्या रक्तस्रावामुळे अनेकजणी बळी पडतात. या भागात स्त्रियांचे कायम शोषण आणि कुपोषण होते. गंभीर आजारांत जीव वाचविण्यासाठी बऱ्याचदा रक्त द्यावे लागते. आदिवासी समाजातील लोक रक्त द्यायला फारसे उत्सुक नसतात. आपल्या पत्नीलासुद्धा रक्त द्यावयास नाकारणारे पुरुष आपणांस इथे भेटतात. त्यामुळे रक्तासाठी दाता शोधण्याचे अवघड काम येथील डॉक्टरांवर येते. कधीकधी तो सहज उपलब्ध होतो. परंतु बहुतांशवेळा त्याच्यासाठी धावाधाव करावी लागते. मकरंद दीक्षितसारखी माझ्या शरीरातील हवं तेवढं रक्त काढून घ्या म्हणणारी व्यक्ती आपणांला इथे भेटते. दुसऱ्यांप्रती कळवळा असणारी मकरंदसारखी कितीतरी माणसे आपणांला या पुस्तकात भेटत राहतात.

नक्षलवादी आणि प्रशासन यांच्यातील संघर्षाचा इथल्या सामाजिक जीवनावर झालेला खोलवरचा परिणामही हे पुस्तक अत्यंत संयतपणे आपल्यासमोर मांडते. छत्तीसगढमधील दंतेवाडा, बिजापूर, बस्तर, सुकमा हे जिल्हे कायम नक्षली चळवळींच्या केंद्रस्थानी असतात. इथले सामान्य लोक या दोन घटकांच्यामध्ये विनाकारणच भरडले जातात. प्रशासनास

सहकार्य केले तर नक्षलवादी त्रास देतात. आतले आणि बाहेरचे या द्वंद्वातच अनेकांना आपली गावे सोडावी लागलेली आहेत, प्राण गमवावे लागले आहेत. या परिसरातील लोकांची दोन्ही पातळीवरील व्यवस्थांशी लढाई सुरू असते. प्रशासनास मदत केली, तर नक्षलवादी लोक त्या लोकांचे जीवन उद्ध्वस्त करून टाकतात. बासागुडासारखी अख्खी गावेच्या गावे इथे नक्षलवाद्यांनी उद्ध्वस्त केली आहेत. प्रशासनाच्या कोणत्याच योजना त्यामुळे इथे गंभीरतापूर्वक राबवता येत नाहीत. इथल्या बऱ्याच लोकांकडे आधार कार्ड नाहीत. ज्यांच्याकडे होती ती नक्षलवाद्यांनी जाळून टाकलेली आहेत. त्यामुळे शासनाच्या योजनांची गरज असूनही इथल्या बऱ्याच लोकांना त्याचा लाभ घेता येत नाही. लेखिका ही सारी गुंतागुंत अत्यंत संयतपणे आपल्यासमोर मांडते.

आदिवासी स्त्रियांची कणखर, सशक्त, कोणत्याही प्रसंगाला हार न मानणारी असंख्य रूपे आपणांला या पुस्तकात भेटत राहतात. साधी सुई टोचली तरी टचकन डोळयांत पाणी आणणारी आमची शहरी स्त्री एकीकडे आणि गंभीर शस्त्रक्रियेनंतरही वेदनेला आसपास फिरकू न देणारी आदिवासी स्त्री एकीकडे आहे. त्यांच्या सोशिकपणाने थक्क होऊन डॉ. ऐश्वर्या एके ठिकाणी लिहितात, "मला बेच्चोच्या जिद्दीचे, सामर्थ्याचे, सहनशक्तीचे प्रचंड आश्चर्य वाटत होते. या सगळयात एकदाही ती रडली नाही किंवा एकदाही 'मला दुखते आहे' अशी तक्रार तिने केली नाही. कशाच्या बनलेल्या आहेत या आदिवासी स्त्रिया? आपल्याला एक सुई टोचली तर रडू येते आणि ही भाजलेल्या खोल जखमा घेऊन, मृत बाळासोबत गर्भाशय काढण्याची मोठी शस्त्रक्रिया होऊनही दोन दिवसांत जिद्दीने उभी राहते, चालते. इतकी शक्ती कुठून येते यांच्या अंगात" (पृ. क्र.२७-२८). मुळातच स्त्रियांकडे सोशिकता अंगभूत असते. आदिवासी स्त्रीकडे ती थोडी अधिक असते. भोवतालचा अंत पाहणारा निसर्ग, अस्तित्व जपण्यासाठी दिवसरात्र करावा लागणारा संघर्ष, रूढी-परंपरांचे न टाकता येणारे ओझे, पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे निमूटपणे सहन करावे लागणारे अन्याय-अत्याचार, या सर्वांतून आपसूकच आदिवासी स्त्रिया तगून राहण्यासाठी धडपडत असतात. बेच्चोसारख्या कितीतरी स्त्रियांची अस्वस्थ करणारी रूपे या डायरीत नोंदविली गेली आहेत. या अनुभवांनी संवेदनशील वाचक बऱ्याचदा सुन्न होऊन जातो. या देशातील स्त्रिया अजूनही माणूसपण मिळण्यासाठी प्रतीक्षेत आहेत, या

विचारांनी सर्द होऊन जातो. डॉ. ऐश्वर्या यांनी कमालीच्या ताकदीने स्त्रियांची ही व्यक्तिचित्रे जिवंत केलेली आहेत.

'सलवा जुडूम' या गोंडी शब्दाचा अर्थ 'शांती अभियान' असा आहे. सन २००५ मध्ये कुटरू, करकेली या गावांतून के. मधुकर राव या शिक्षकाने नक्षलवादी चळवळीला आणि त्यांनी केलेल्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी ही चळवळ सुरू केली होती. सुरुवातीला काही गावांपुरते मर्यादित असणारे हे अभियान बिजापूर जिल्ह्यात सर्वत्र पसरले. लोकांचा आणि काही स्थानिक लोकप्रतिनिधींचा याला उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला. सुरुवातीला शांततामय मार्गाने सुरू असलेल्या या अभियानाला मात्र नंतर रक्तरंजित वळण लागले. या अभियानात सामील झालेल्या कित्येक आदिवासींना नंतर नाहक प्राणांना मुकावे लागले. आजही काही लोक त्या अभियानाच्या दहशतीखाली जगत असल्याच्या नोंदी आपणांला या पुस्तकात जागोजाग विखुरलेल्या दिसतात. छत्तीसगढ जगाच्या नकाशावर ठळक होण्यामागे 'सलवा जुडूम' हे आंदोलन बऱ्यापैकी कारणभूत आहे. छत्तीसगढ म्हटले की लोकांना आजही 'सलवा जुडूम' हे शब्द आठवतात. या आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या नातेवाईकांनी गावे सोडली. अनाथ झालेल्या मुलांना घेऊन के. मधुकर राव यांनी पंचशील नावाचा आश्रम सुरू केला. आजही त्या आंदोलनाने निर्माण केलेल्या जखमा इथल्या लोकांच्या जगण्यात ठळकपणे जाणवतात. अपरिहार्यपणे त्या जखमांना सोबत घेऊनच ही माणसे निमूटपणे आपले जगणे जगत राहतात.

समाजासाठी काहीतरी चांगले करायचे, या हेतूने आपल्या रूढ अर्थाने समृद्ध आयुष्याचा त्याग करून, संघर्षमय आयुष्य स्वीकारून खऱ्या अर्थाने समृद्ध जीवन जगणारे अनेक देवदूत आपणाला या पुस्तकात भेटतात. बारसूर येथे गेल्या तीस वर्षांपासून आदिवासींसाठी दवाखाना चालविणारे डॉ. रामचंद्र आणि सुनिता गोडबोले हे दाम्पत्य, बिजापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. अय्याज तांबोळी, आदिवासी मुलांसाठी सहलींचे आयोजन करणारे, नक्षलग्रस्त भागात पहिल्यांदा मॅरेथॉन स्पर्धा घेणारे आयपीएस अधिकारी दिव्यांग पटेल, पुण्यातील इंजिनियरची चांगल्या पगाराची नोकरी सोडून विविध भागांतील मुलामुलींना ओरिगामी, हस्तकला शिकवणारा मकरंद दीक्षित, बिजापूर येथील मुलांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळांत सहभाग नोंदवावा म्हणून प्रयत्न करणारे क्रीडा प्रशिक्षक भुवन नागे आणि सोपान कर्णेवार, 'बचपन बनाओ'चे प्रणीत सिन्हा आणि त्यांची टीम, दहशतीच्या

छायेतही आपल्यातील पत्रकार जिवंत ठेवणारा मुकेश चंद्राकार, 'बिट्स पिलानी' संस्थेतून इंजिनिअर होऊन बाहेर पडलेला आणि 'जैविक कॅफे' चालवणारा आकाश बडवे, बस्तरला जागतिक पर्यटन केंद्र बनवू पाहणारा जीतसिंह आचार्य अशा अनेक दिशांहून आलेल्या आणि आदिवासींचे कल्याण हा समान उद्देश असणाऱ्या त्यागी लोकांचे प्रेरणादायी कार्य आपणांला या पुस्तकात वाचायला मिळते.

छत्तीसगढच्या निसर्गाची मोहक रूपेही अधूनमधून आपणांला या पुस्तकात वाचायला मिळतात. वेगवेगळ्या प्रकारची झाडे, फुले, फळे, प्राणी यांनी समृद्ध असणारा हा प्रदेश लोकांच्या जगण्यातही तितकीच नैसर्गिकता जोपासणारा आहे. जीवनाविषयीची माफक अपेक्षा ठेवून जगणारी इथली माणसे म्हणूनच आनंदी आहेत. छोट्या-छोट्या गोष्टीत आनंद मानणारी आहेत. बाहेरच्या जगातील माणसे त्यांना बदलण्यासाठी खूप उत्सुक आहेत, परंतु ही माणसे मात्र आपले नैसर्गिकपण अजूनही टिकवून आहेत. आपले सांस्कृतिक वेगळेपण टिकवून ठेवण्यासाठी ही माणसे अजूनही प्रयत्नशील आहेत. इथले सण-समारंभ, विवाह-सोहळे, जत्रा यानिमित्ताने म्हटली जाणारी गाणी, केले जाणारे नृत्य त्यांना अजूनही पुढारलेले मानलेल्या जगापासून वेगळे ठरवतात आणि कदाचित त्यातच त्यांची खासियत आहे, असे निरीक्षण लेखिका नोंदविते.

सहज, प्रवाही निवेदन, चित्रमय वर्णन, अनुभवांची दृश्यात्मक मांडणी अशी काही भाषिक वैशिष्ट्ये या पुस्तकात आढळतात. गोंडी भाषेतील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा वापर लेखिकेने अत्यंत खूबीने केलेला आहे. जसे की, मितानीन (मैत्रीण), बंजेर (जीभ), अबुझमाड (अज्ञात पहाड), भूमगादी (आदिवासी लोकांचा सण), चापडा (मुंग्यांची चटणी), कोसा (रेशीम किड्यांपासून बनवलेले खाद्य), कुचिया (विकत घेणारा), तिकुर (कंदमूळ) इत्यादी आदिवासी लोकजीवनाशी संबंधित असणाऱ्या नाविन्यपूर्ण शब्दांची ओळख आपणांस यानिमित्ताने घडून येते. एक वैशिष्ट्यपूर्ण लय या सगळ्या लेखनाला आहे. नक्षलवाद आणि आदिवासी समाज यांच्या पलीकडे छत्तीसगढची फारशी ओळख नसलेल्या लोकांना हे पुस्तक नक्कीच तिथल्या अनोख्या विश्वाची आश्चर्यचकित करायला लावणारी ओळख घडवून आणेल. तसेच खाजगी आयुष्यातील मोहांना टाळून, ऐषारामी जीवन जगण्याची संधी नाकारून, सुखाच्या रूढ संकेतांना तिलांजली देऊन दुसऱ्याचे ते दुःख आपले दुःख मानून आयुष्याचा उभरता काळ

केवळ वंचितांच्या, रंजल्या-गांजलेल्यांच्या सुखासाठी उधळून देणाऱ्या, नवभारताच्या उभारणीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या अनोख्या माणसांच्या कार्याची ओळख घडवून आणण्याच्या प्रवासाला घेऊन जाणारी ही *बिजापूर डायरी* प्रत्येकाने विशेषतः जग बदलू पाहणाऱ्या तरुणांनी आवर्जून वाचावी अशीच आहे.

संभाषित


# रायटिंग द फर्स्ट पर्सन : आधुनिक केरळमधील स्व-विषयक लिखाणाची समीक्षा

**राहुल सरवटे**

साहाय्यक प्राध्यापक

अहमदाबाद विद्यापीठ

rahul.sarwate@gmail.com




(परीक्षित पुस्तक : *रायटिंग द फर्स्ट पर्सन: लिटरेचर, हिस्टरी, ॲण्ड ऑटोबायोग्राफी इन मॉडर्न केरल*, लेखक: उदय कुमार, प्रकाशक: पर्मनंट ब्लॅक, रानीखेत, प्रकाशन वर्ष : २०१६, पृष्ठे : ११+३२४, मूल्य: रु. ८९५)

गेल्या काही वर्षांत भारतीय आधुनिकतेच्या प्रांतविशिष्ट आवृत्त्यांचा सखोल आणि व्यापक अभ्यास होताना दिसतो. विशेषतः एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील वर्तमानपत्रं-नियतकालिकं आणि त्यांच्या आश्रयानं विकसित झालेली विशिष्ट सामुदायिक जाणीव ही ह्या अभ्यासात प्राधान्यानं दिसते. बंगालविषयक मुबलक लिखाण नेहमीच उपलब्ध होतं. पण आता अन्य भाषांमधील लेखनही उपलब्ध होत आहे. हिंदीच्या संदर्भात वसुधा दालमिया, फ्रांसिस्का ऑर्सिनी, बद्री नारायण आणि इतर अनेकांचं लेखन तसंच तमिळबद्दलचं ए आर वेंकटचलपथी, डेविड शुल्मन आणि जे.बी.पी. मोरे ह्यांचं लेखन तर सच्चिदानंद मोहंती यांचं आधुनिक उडियातील प्रिंटविषयक विश्लेषण; अशा अनेक नव्या-जुन्या लेखकांचा उल्लेख करायला हवा.

निरनिराळ्या भारतीय प्रांतांच्या आधुनिकतेचे सांस्कृतिक आणि राजकीय आकार-उकार हे स्थळ-सापेक्ष असले तरीही त्यातून आधुनिकतेच्या भारतव्यापी आकलनाची सूत्रे हाती लागतात. केरळच्या संदर्भात जे. देविका, शर्मिला श्रीकुमार अशा स्त्रीवादी अभ्यासकांनी केरळी आधुनिकतेचा आलेख रेखाटण्याचा उत्तम प्रयत्न केलेला आहे आणि जेएनयूमधील इंग्रजी साहित्याचे प्राध्यापक उदय कुमार यांचं *रायटिंग द फर्स्ट पर्सन* हे पुस्तक ह्याच वाटेनं आणखी पुढे जाणारं आहे.

उदय कुमार केरळमधल्या आधुनिक 'स्व'च्या निर्मितीची प्रक्रिया, ह्या 'स्व'चे निरनिराळ्या वाङ्मयीन स्वरूपातील आविष्कार आणि ह्या स्व-भानातून प्रकटणारी सामाजिक जाणीव ह्या तिन्ही परस्परसंबद्ध प्रक्रियांचं ऐतिहासिक आणि वाङ्मयीन विश्लेषण करतात.

एकोणिसाव्या शतकात वासाहतिक राज्यव्यवस्था, इंग्रजी शिक्षण, आणि मुद्रण-प्रकाशन-वितरण ह्या गोष्टींमुळे एक नव्या 'स्व'ची निर्मिती झाली, व्यक्तीला समाजापासून स्वतंत्र नवं आत्मभान आलं आणि विविध सामूहिक जातीय-धार्मिक अस्मितांची चिकित्सा शक्य झाली. आधुनिक काळातल्या ह्या अभिनव आणि सर्वस्वी नव्या बदलांची नोंद आपल्याला स्व-विषयक लिखाणात आढळते. ह्यात आत्मचरित्र, ललित निबंध, स्फुट लेख, कविता, कथा, कादंबरी अशा विविध प्रकारच्या लिखाणाचा समावेश आहे, ज्यामधून नव्या आत्मभानाची, बदलत्या सामाजिकतेची आणि मूल्यव्यवस्थांची जाणीव व्यक्त होते. एकीकडे, भारतीय सामाजिक व्यवस्थेत आलेल्या नव्या लवचिकतेमुळेच हे आत्मभान निर्माण झाले, तर दुसरीकडे, ह्या आत्मभानाचा आविष्कार स्वतःच्याच चिकित्सेतून (सेल्फ-क्रिटीक) व्यक्त झाला. स्व-जाणिवेची ही गुंतागुंत उदय कुमार ह्या सुमारे साडे-तीनशे पानांच्या आणि प्रास्ताविक व सहा प्रकरणांच्या पुस्तकात तपशीलवारपणे उलगडण्याचा प्रयत्न करतात.

पुस्तकाचं मुख्य सूत्र आधुनिक केरळातील 'स्व'चे विविध आविष्कार हे आहे, पण ते वाङ्मयीन इतिहास, सामाजिक इतिहास, केरळची पुरोगामी स्व-प्रतिमा आणि काळाचे बदलते पदर अशा एकमेकांत गुंफलेल्या धाग्यांमधून विकसित झालं आहे. पहिल्या प्रकरणात उदय कुमार ह्या विविध धाग्यांचं विस्तारानं विवेचन करतानाच स्व-कथनाच्या अभ्यासाची सैद्धांतिक चर्चा करतात.

सामाजिक स्थान व्यक्त करणारी जात ही नेहमीच 'शारीर' होती आणि प्रत्येक व्यक्ती जातीय रचनेशी शरीराने जखडलेली असे, हे उदय कुमार दाखवून देतात. पेहराव, पागोटं, दाग-दागिने, दाढी-मिश्या राखण्याच्या पद्धती वगैरे जाती-जातीनुसार बदलत असत आणि त्यातून त्या जातीचा सामाजिक स्तर निश्चित होत असे. (ह्या संदर्भात, एस. हरीश ह्यांची मूळ मल्याळम भाषेतील आणि नुकतीच इंग्रजीत अनुवादित झालेली 'मुस्ताश' ही कादंबरी आवर्जून पाहण्यासारखी आहे.) आधुनिकपूर्व काळातल्या जात-पितृसत्ता-लिंगभावाची रचना व्यक्तीच्या शारीर अस्तित्वाला जखडून असल्यामुळे, आधुनिकतेतली क्रमाक्रमाने वाढत गेलेली मोकळीक ह्या नव्या 'स्व'च्या जडणघडणीत मोलाची ठरली. परंपरेच्या अशा शारीर बंधनातून मोकळं होण्याच्या प्रक्रियेत कुठे हिंसा घडली; आपल्याहून खालच्या जातीच्या लोकांनी दागिने वापरले म्हणून जातीय दंगली घडल्या तर कुठे नवीन कल्पित इतिहासाची मांडणी झाली असे अनेक टप्पे उदय कुमार नोंदवतात. ह्यातूनच 'श्रीनारायण धर्म परिपालन' ही प्रामुख्याने इळावा जातीतल्या मंडळींची चळवळ, नायरांचा 'नायर समाजम', ब्राह्मणांची 'नम्बुद्री योगक्षेम सभा' अशा नव्या जातजाणिवांची निर्मिती करणाऱ्या सभा अथवा चळवळी उभ्या राहिल्या आणि समुदाय, जात, इतिहास, अशा कोटीक्रमांविषयी नव्या चर्चा प्रसृत झाल्या. वासाहतिक राज्यसत्ता आणि पौर्वात्यवाद हे या बदलांच्या मुळाशी होतेच पण त्यामुळे जातविषयक आणि व्यक्ती व समुदायविषयक असे एक नवे संभाषित (डिस्कोर्स) खुले झाले. हे संभाषित काही प्रमाणात जुन्या धर्मशास्त्रीय आधारांचा वापर करत असले तरी आता सामाजिक समता, व्यक्तीचे वैश्विक हक्क आणि नव्या वासाहतिक धोरणांमुळे संख्येला आलेलं राजकीय महत्त्व या आधारांचीही त्यात भर पडली होती. नव्या-जुन्या प्रमाणांची काहीशी सरमिसळ ह्यात होत होती. (डॉ. पी. पळपु ह्या इळावा जातीतल्या विचारवंतांनी पुराणांचं नवं वाचन करण्याचा प्रयत्न केला, व्युत्पत्तीचे अभिनव सिद्धांत मांडले. मात्र हे मुख्यत: वितंडवादी (पोलेमिकल) संभाषित असल्यानं अनेक अनैतिहासिक विधानंही बिनदिक्कतपणे केली जात. उदाहरणार्थ, व्युत्पत्तिशास्त्राच्या आधारे डॉ. पळपु चीनवर केरळी संस्कृतीचा प्रभाव होता, अशी मांडणीही करतात.)

ह्या सगळ्या व्यापक पार्श्वभूमीवर केरळी आत्मभानाची चर्चा करताना, उदय कुमार मुख्यत: दोन सैद्धांतिक मुद्दे मांडतात. एक म्हणजे आधुनिक स्व-विषयक लिखाण हे वैयक्तिक भावजीवनाचे पडसाद म्हणून न पाहता,

ते नव्या सामाजिकतेचा आणि राजकीयतेचा दस्तऐवज म्हणून वाचायला हवं आणि दुसरा असा की ह्या लिखाणातून व्यक्त होणारी नवी भाषाशैली, नवी दृश्यमानता आणि लिहिणाऱ्याचं सामाजिक स्थान यांचा परस्परसंबंध तपासायला हवा.

या पुस्तकातील प्रास्ताविकाखेरीजची सहाही प्रकरणं एकमेकांशी घनिष्ठपणे संबद्ध आहेत. उदय कुमार यांना 'साईट्स ऑफ प्लूरलायझेशन' म्हणतात. अर्थात एखाद्या लेखकाचा किंवा पुस्तकाचा विचार करताना विविध प्रकारच्या कोटीक्रमांचे फाटे फुटून हे विवेचन बहुविध दिशेने मार्गक्रमण करू लागणे, होय.

दुसऱ्या प्रकरणात श्रीनारायण गुरु ह्या इळावा जातीतील विख्यात धर्मसुधारकाच्या आत्मचरित्राची अतिशय रोचक चर्चा येते. नारायणगुरूंच्या तात्त्विक, समाजशास्त्रीय, आध्यात्मिक अशा विविध स्वरूपाच्या लिखाणाची चर्चा करताना; उदय कुमार त्यांच्या एकंदर मांडणीतील 'शरीर' ह्या कोटीक्रमाची वास्तव आणि रूपक अशा दोन्ही अर्थांनी चिकित्सा करतात. इथे, उदय कुमार आधुनिक मल्याळममधील शारीरतेविषयक संभाषितांचा इतिहास तपासू पाहतात. नारायण गुरूंच्या प्रभावामुळे, वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर 'भेद' किंवा 'भिन्नता' ह्या संकल्पनेची मांडणी शारीरतेच्या आधारे होऊ लागली, असं ते प्रतिपादन करतात.

तिसऱ्या प्रकरणात उदय कुमार नारायण गुरूंचे एक शिष्य कुमारन आसन ह्यांच्या कवितेचा विचार करतात. आसन यांच्या कवितेत बहुतेकदा स्त्री निवेदक असून ह्या कवितांनी आधुनिक मल्याळममध्ये स्व-परीक्षणाची नवीन विचारभाषा आकाराला आणली. ह्या कवितेत एकाच 'स्व'ची बहुविध रूपे परस्परसंवादी आहेत आणि त्यांमधून शारीरता धूसर होत भावना/विचार प्रधान होतात. नारायण गुरूंच्या लिखाणांत, जातिबद्धतेपासून शारीरता मुक्त होऊ पाहते तर, कुमारन आसन यांच्या कवितेत व्यक्तीचं अंतर्जीवन आणि तिच्या इच्छा यांच्याशी भाषेचं थेट नातं प्रस्थापित करण्याचा प्रयत्न दिसतो.

ह्यानंतरच्या दोन प्रकरणांतून, आधुनिक मल्याळम कादंबरीच्या ऐतिहासिक विकासाची चर्चा येते. मल्याळम कादंबरी जुन्या भारतीय परंपरेतल्या आख्यानापेक्षा निराळा फॉर्म विकसित करू पाहत होती तरीही ह्या प्रयत्नांतून इंग्रजी कादंबरीतली पात्रं आणि संस्कृत काव्याचा अवकाश असलेलं काहीसं अस्थिर आणि गुंतागुंतीचं विश्व उभं राहिलं. ह्या नव्या कादंबऱ्यांसोबतच त्यांचा वाचकवर्गही घडत होता, त्यांचं मनोरंजन

आणि प्रबोधन हे ‘कादंबरी’ ह्या कल्पिताच्या नव्या फॉर्मचं ध्येय होतं. मल्याळममधल्या अगदी सुरुवातीच्या कादंबऱ्यांमध्ये वस्तुजगत, वास्तव आणि अवकाश कसा आकाराला आला आणि त्याचं नव्या वाचकवर्गाशी कुठलं नातं होतं हा प्रश्न, ह्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

सर्वसाधारणपणे मल्याळम वाङ्मयीन इतिहासात कादंबरीच्या ऐतिहासिक विकासाच्या तीन प्रमुख सूत्रांची म्हणजे प्रबोधनवादी कादंबरी, ऐतिहासिक/अद्भुतरम्य कादंबरी आणि धर्मांतराच्या अनुभवांतून साकारलेली कादंबरी; यांची चर्चा टाळून, उदय कुमार सुरुवातीच्या मल्याळम कादंबऱ्यांत उभे राहिलेले दृश्यात्मकतेचे अनुभव प्रधान मानतात. त्यांच्या विवेचनाचा थोडक्यात सारांश असा की आधुनिक मल्याळम कादंबरीतील पात्रं, अवकाश, वास्तव आणि कादंबरीबाहेरचा वाचक यांच्या दरम्यान एक नवं परिदृश्य (फील्ड) साकारलं जाऊन त्याद्वारे शारीरता, सामाजिक वास्तव आणि कल्पित यांच्या परस्परसंबंधांचं नवं प्रारूप विकसित झालं.

शेवटचं, आठवण (मेमरी) आणि आत्मभान यांच्या परस्परसंबंधांच्या विवेचनाचं सुमारे नव्वद पानांचं दीर्घ प्रकरण हे मुळातूनच वाचण्यासारखं आहे. मल्याळममध्ये सुधारणावादी दृष्टीनं लिहिलेल्या आत्मकथा/आठवणी यांचं वारेमाप पीक आल्याची नोंद घेऊन, ह्यातून व्यक्तीच्या आंतरिक परिवर्तनातून काळाची नवी जाणीव कशी व्यक्त होते याचं विवेचन उदय कुमार करतात. (मराठीची तुलना इथे प्रस्तुत ठरेल.)

एकंदर, केरळी (भारतीय) आधुनिकतेतल्या वाङ्मय, इतिहास आणि स्मृती यांच्या परस्परसंबंधांचं सखोल, सैद्धांतिक आणि तरीही तरल विश्लेषण करणारं हे पुस्तक आवर्जून वाचायला हवं. विशेषत: महाराष्ट्राच्या संदर्भात, साहित्य-इतिहास आणि स्मृतींच्या धाग्यांचा उलगडा अशा व्यापक सैद्धांतिक परिप्रेक्ष्यात पाहणं अतिशय रोचक आणि उद्बोधक ठरेल. सामाजिक आणि वाङ्मयीन इतिहास एकमेकांत गुंफलेले असून त्यांचं एकत्रित परिशीलन आवश्यक असतं, अशी दृष्टी उदय कुमारांच्या अभ्यासातून येऊ शकेल.

# लेखक परिचय

संपादक परिचय

**दिलीप चव्हाण**

दिलीप चव्हाण हे स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक- सांस्कृतिक जडणघडणीचे साक्षेपी अभ्यासक व विचारवंत म्हणून त्यांना अनेक भारतीय विद्यापीठांत निबंधवाचक आणि मान्यवर वक्ते म्हणून आमंत्रित केले जाते. संस्कृती अभ्यास, स्त्रीशिक्षण, जातपितृसत्ता, साम्राज्यवाद, भाषेचे राजकारण, शिक्षण हे त्यांच्या संशोधनाचे विषय आहेत. दिलीप चव्हाण यांची *फुले शाहू आंबेडकर आणि जातिव्यवस्थाअंत* (सहलेखन १९९८ व २००३ (पुनर्मुद्रण), *शिक्षण : जातवर्गीय वास्तव आणि समतावादी पर्याय* ( १९९८), *स्त्री शिक्षणाचा संघर्ष* (२००३ व २००७ (सुधारित आवृत्ती)), *डॉ. आंबेडकर आणि भारतीय शिक्षणातील जाती संघर्ष* (२००३), *साम्राज्यवाद आणि संस्कृती* (२००५), *साम्राज्यवाद: भाषा आणि संस्कृती* (२०१० सुधारित आवृत्ती), *समकालीन भारत: जातिअंताची दिशा* (२०१९ ) ही मराठी पुस्तके तसेच *साम्राज्यवाद : भाषा और संस्कृती* हे हिंदी आणि *Language Politics under Colonialism: Caste, Class and Language Pedagogy in Western India* हे इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध आहे.

**मानसी वाळिंबे**

मानसी वाळिंबे या श्री. बन्सीधर अग्रवाल जुनिअर कॉलेज, वडाळा येथे गेल्या आठ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्या २०११ पासून मराठी भाषाविषयाचे अध्यापन करीत असून त्यांनी C.H.M महाविद्यालय, उल्हासनगर येथे बी.ए. व एम.ए.साठी अध्यापन केलेले आहे. १९९५ मध्ये त्यांनी एस.एन.डी.टी. विद्यापीठातून 'केशवसुत आणि मर्ढेकर यांच्या कवितेतील संस्कृतीभेद' या विषयात एम.फिल पदवीसाठी संशोधन केले आहे. सध्या त्यांचे 'विसाव्या शतकातील मराठीतील गीताभाष्ये : वाङ्मयीन आणि वैचारिक अभ्यास' या विषयावर पीएच.डी. पदवीसाठीचे संशोधन कार्य सुरू आहे.

**नंदकुमार विष्णू मोरे**

नंदकुमार विष्णू मोरे हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मराठी विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाचे 'संत तुकाराम अध्यासन' आणि 'राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्र' यांचे समन्वयक म्हणून सक्रीय आहेत. त्यांनी 'मराठी कादंबरीची समाजभाषावैज्ञानिक चिकित्सा' या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केली असून विविध राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि विद्यापीठीय चर्चासत्रांमधून चाळीसहून अधिक शोधनिबंध सादर केले आहेत. नंदकुमार मोरे यांनी 'चंदगडी बोली : इतिहास आणि भूगोल' (विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली), 'कोल्हापूर जिल्ह्यातील पारंपरिक व्यावसायिक, बलुतेदारांच्या संस्कृतीचा, लोकसाहित्याचा आणि बोलीभाषांचा अभ्यास' (आयसीएसएसआर, दिल्ली),

'मराठी संस्थानांचा इतिहास' (महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई) आणि 'चंदगडी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास (राज्य मराठी विकास संस्था, मुंबई) हे संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. डॉ. गणेश देवी यांच्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' या प्रकल्पामध्ये 'चंदगडी बोली' या विषयावर लेखनही केले आहे. नंदकुमार मोरे यांची *समाजाभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी* (२०१२ ), *भाषासंवाद* (२०१३, सहलेखन ), *समीक्षापद्धती:सिद्धांत आणि उपयोजन* ( २०११, सहसंपादन) ही पुस्तके प्रसिद्ध असून त्यांना महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीसाठी (२०११-१२) दिल्या जाणाऱ्या 'नरहर कुरुंदकर राज्य पुरस्कारा'ने गौरविण्यात आलेले आहे.

**रविकांत शिंदे**

रविकांत शिंदे हे श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी, जि. सोलापूर येथे मराठी विषयाचे साहाय्यक प्राध्यापक म्हणून गेल्या दहा वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांनी 'जी. ए. कुलकर्णी आणि भारत सासणे यांच्या गूढकथांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथून पीएच.डी. संपादित केली आहे. रविकांत शिंदे यांनी 'युजीसी, नवी दिल्ली' येथे सादर केलेल्या 'नव्वदोत्तर मराठी कथेचा रूपबंध' या विषयावरील लघु शोधप्रबंधास एक लाख पन्नास हजार रुपयांचे अनुदान प्राप्त झाले होते. *ग्रामीण साहित्याचा इतिहास* या रामचंद्र काळुंखे संपादित ग्रंथात त्यांचा 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कथा' या विषयावरील लेख प्रकाशित झाला आहे.

**राहुल सरवटे**

राहुल सरवटे हे इतिहासकार असून ते सध्या अहमदाबाद विद्यापीठात साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी कोलंबिया युनिव्हर्सिटी, न्यू यॉर्क येथून इतिहासात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे 'विसाव्या शतकातल्या महाराष्ट्राचा वैचारिक इतिहास' या विषयांवरील लेखन कार्य सुरू आहे. आधुनिक भारतीय भाषांमधील कादंबरी आणि सर्व प्रकारचा दक्षिणी सिनेमा हे त्यांच्या आवडीचे विषय आहेत.

संभाषित

# संदर्भ देण्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना

'संभाषण' मासिकासाठी शोधनिबंध लिहिताना शोधनिबंधकाराने **In Text parenthetical Author-Date citation** या संदर्भ पद्धतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे.

**In Text parenthetical Author-Date Citation** ही संदर्भ देण्याची अधिक सुटसुटीत पद्धत आहे. या पद्धतीनुसार प्रत्यक्ष लेखातील मजकुरामध्ये वा विवेचनामध्ये संदर्भांचे आधार देणे अभिप्रेत असते. या पद्धतीने संदर्भ देताना लेखकाचे आडनाव, संदर्भग्रंथाचे प्रकाशनवर्ष आणि उद्धृत संदर्भाचा पृष्ठ क्रमांक नोंदविणे आवश्यक असते.
उदाहरणार्थ,
(रेगे २००४ : ७५)
सदर संदर्भग्रंथाविषयीचे अन्य तपशील लेखाच्या शेवटी जोडलेल्या संदर्भांच्या यादीमध्ये समाविष्ट केले जातात.
उदाहरणार्थ,
रेगे, मे. पुं. (२००४) **:** *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह**,** मुंबई.

शोधनिबंधाच्या शेवटी संदर्भसाधने नमूद करताना मराठी आणि इंग्रजी भाषेतील संदर्भांची स्वतंत्र नोंद करावी. तसेच ही माहिती देताना ग्रंथ (स्वतंत्र, संपादित इत्यादी), नियतकालिक, वर्तमानपत्र, अप्रकाशित प्रबंध, प्रबंधिका, संकेतस्थळ आणि समाजमाध्यम हा क्रम पाळावा.

**संदर्भ देताना ग्रंथकाराच्या,/संपादकाच्या आडनावाने प्रारंभ करून आडनावानुक्रमे नोंद करणे आवश्यक आहे.**
उदाहरणार्थ,
मतकरी, रत्नाकर (१९८३) : *स्पर्श अमृताचा*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मनोहर, श्याम (१९८३) : *हे ईश्वरराव...हे पुरुषोत्तमराव...*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

**एकाच लेखकाच्या एकाहून अधिक पुस्तकांचे संदर्भ येत असतील तर वर्षानुक्रम पाळावा.**
उदाहरणार्थ,
नेमाडे, भालचंद्र (१९८७) : *साहित्याची भाषा*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद .
नेमाडे, भालचंद्र (१९९०) : *टीकास्वयंवर*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

संशोधन

**एका लेखकाच्या एकाच वर्षातील एकाहून अधिक ग्रंथांचा, लेखांचा संदर्भ येत असेल तर पुढीलप्रमाणे लिहावे.**

उदाहरणार्थ,

पाटील, गंगाधर (१९९१ अ) : 'चिन्हमीमांसा', *अनुष्टुभ*, मार्च –एप्रिल, पृ. ३-६.

पाटील, गंगाधर (१९९१ आ) : 'कथनमीमांसा', *अनुष्टुभ*, दिवाळी अंक, पृ. ८६ -१२७.

एकाच साधनाचा संदर्भ लागोपाठ येतो तेव्हा 'तत्रैव' शब्द वापरून पृष्ठ क्रमांक द्यावा. उदाहरणार्थ, लेखात एखाद्या पुस्तकाचा संदर्भ पहिल्यांदा येत असेल तर तो (मुक्तिबोध १९९७ : ३१) अशा पद्धतीने नोंदवावा. हाच संदर्भ सलग आल्यास (तत्रैव, पृ. ४९) असे लिहावे.

**लेखाच्या शेवटी देण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या संदर्भसाधनांच्या नोंदींची प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. ही उदाहरणे देत असताना IN-TEXT-CITATION पद्धतीनुसार प्रत्यक्ष विवेचनात संदर्भ कसे द्यायचे यासंबंधीचे नमुनेही देण्यात आले आहेत.**

ग्रंथ (book)

**एक लेखक**

रेगे, मे. पुं. (२००४) : *विवेकवाद, विज्ञान आणि श्रद्धा,* लोकवाङ्मय गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(रेगे २००४ : २५)

**दोन लेखक**

मालशे, मिलिंद व जोशी अशोक (२००७) : *आधुनिक समीक्षा सिद्धांत*, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**IN- TEXT-CITATION**

(मालशे व जोशी २००७ : ७८)

**संपादक (एक)**

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) (१९६२) : *भारतीय संस्कृतिकोश- खंड १*, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

**IN-TEXT-**CITATION

(जोशी १९६२ : ६०)

**संपादक (दोन)**

भोळे, भा. ल. व बेडकिहाळ किशोर (संपा.) (२००३) : *बदलता महाराष्ट्र*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.

**IN-TEXT-**CITATION

(भोळे व बेडकिहाळ २००३ : ३६)

**संपादक (दोनापेक्षा अधिक असल्यास)**

नाईक, राजीव व इतर (संपा.) (१९८८) : *रंङ्गनायक,* आविष्कार प्रकाशन, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक व इतर १९८८ : ५९)

**संपादित ग्रंथातील लेखाचा संदर्भ**

केळकर, अशोक (१९८१) : 'भाषावैज्ञानिक संशोधनाच्या नव्या दिशा', *भाषा व साहित्य : संशोधन,* वसंत जोशी (संपा.) , महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ. ४७-६८.

IN-TEXT-**CITATION**

(केळकर १९८१ : ५०)

**अनुवादित**

आंबेडकर, बाबासाहेब (२००५) : दु. आ., *जातिव्यवस्थेचे विध्वंसन*, गौतम शिंदे (अनु.), सुगावा प्रकाशन, पुणे.

IN-TEXT-**CITATION**

(आंबेडकर २००५ : ३८)

**संपादित आणि अनुवादित ग्रंथ**

बापट, पु. वि. (संपा.) (२००१) : *धम्मपद,* पु. मं. लाड (अनु.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

IN-TEXT-**CITATION**

(बापट २००१ : १५)

नियतकालिकातील लेख

चौसाळकर, अशोक (२०१९) : 'चिनी क्रांतीची ७० वर्षे', *समाज प्रबोधन पत्रिका,* ऑक्टोबर-डिसेंबर, पृ. ३-११.

पळशीकर, सुहास (२०२०) : 'नागरिकत्वविषयक दुरुस्तीचे वास्तव', *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. १८ -२४.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(चौसाळकर २०१९ : ७)

(पळशीकर २०२० : २१)

**वर्तमानपत्रातील लेख**

नाडकर्णी, कमलाकर (२०२०) : 'होय, बालरंगभूमीही 'प्रायोगिक' होती!', *लोकसत्ता*, २४ मे, पृ. १२.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाडकर्णी २०२० : १२)

**ग्रंथपरिचय**

फडके, अनंत (२०२०) : 'विकासनीतीची कठोर चिकित्सा (पूर्वार्ध)' अच्युत गोडबोले यांच्या *अन्वर्थ -विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?* या पुस्तकाचे परीक्षण, *परिवर्तनाचा वाटसरू*, १६ ते २९ फेब्रुवारी, पृ. ४६-४९.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

संभाषित

IN-TEXT-**CITATION**

(फडके २०२० : ४८)

### मुलाखत

केतकर, कुमार (२०१७) : 'मार्क्स : प्रभाव आणि परिणाम' शेखर देशमुख (मुलाखतकार), *साधना*, मे, पृ. २२-२३.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(केतकर २०१७ : २२)

### भाषण

दरेकर, प्रविण (२०१४) : 'चांगल्या शैक्षणिक धोरणाची राज्याला आवश्यकता आहे!', *विधिमंडळातील राजगर्जना,* नवता प्रकाशन, मुंबई, पृ. ५४-५७.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(दरेकर २०१४ : ५५)

### अप्रकाशित प्रबंध आणि प्रबंधिका

नाईक, कृष्णा बाबली (२०१६) : 'रत्नाकर मतकरींच्या गूढकथा : स्वरूप आणि अभ्यास', अप्रकाशित प्रबंध, मुंबई विद्यापीठ.

महाजालावरून (इंटरनेट) संदर्भ घेतला असेल तर संकेतस्थळाचे (वेबसाईट) नाव.

IN-TEXT-**CITATION**

(नाईक २०१६ : ८७)

संशोधित

## वेबसाईट संदर्भ

**संकेतस्थळावरील परीक्षण**

आळवेकर, एकनाथ (२०१८) : 'रिंगाण : उत्क्रांतीची नवी दिशा देणारी कादंबरी', पीडीएफ.

http://vivekresearchjournal.org/current_issue.html

(संकेतस्थळाला भेट २७ फेब्रुवारी २०१९)

IN-TEXT-**CITATION**

(आळवेकर २०१८)

**संकेतस्थळावरील लेख**

कुलकर्णी, हेरंब (२०२०) : 'शिक्षणाची कक्षा आणि कक्षेचे शिक्षण'

http://herambkulkarniarticles.blogspot.com/2020/01/blog-post_4html?m=1

(संकेतस्थळाला भेट २८ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(कुलकर्णी २०२०)

**संकेतस्थळावरील पुस्तक**

मनोहर, यशवंत (२०१२) : *विचारसत्ता*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

http://yashwantmanohar.com/pdf/Bauddha%20Sanskruti%20Ani%20Sah

itya.pdf

(संकेतस्थळाला भेट १५ मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(मनोहर २०१२)

**संकेतस्थळावरील वर्तमानपत्र**

हेमाडे, श्रीनिवास (२०२०) : 'परीक्षा - विद्यार्थ्यांची आणि अस्तित्वाची'

**https://** www.esakal.com/sampadakiy/shrinivas-hemade-article-about-student-299349

(संकेतस्थळाला भेट ३० मे २०२०)

IN-TEXT-**CITATION**

(हेमाडे २०२०)

**समाजमाध्यम**

बोरगावे, दीपक (२०२०) : 'रोमान याकोबसन आणि भाषांतर अभ्यास'

http://www.facebook.com/story.php?story_fbid=18731

संक्षिप्त

संभाषित

अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा यांचे कार्यालय,
मुंबई विद्यापीठ, आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस,
विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.

**© 'संभाषित' या तज्ज्ञपरीक्षित संशोधन-पत्रिकेतील (Peer-Reviewed Research Journal) कोणत्याही मजकुराचे पुनर्मुद्रण पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.**

**लेख पुढील ई-पत्त्यावर (Email) पाठवावेत.**

**editorinchief.sambhashit@mu.ac.in** with a cc to
**editor.sambhashit@mu.ac.in**